# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. १८/ २०१२** **दिनांक ०८.११.२०१२**

**स्थळ - अहमदनगर (जिल्हाधिकारी कार्यालय)** **वेळ- सायंकाळी ०६.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा गुरुवार दिनांक ०८ नोव्हेंबर,२०१२ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता अहमदनगर येथे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस-वशी-०४-३५३९-२०१२, दिनांक ०७ नोव्हेंबर,२०१२ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा गुरुवार दि.०८.११.२०१२ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता अहमदनगर येथे जिल्हाधिकारी कार्यालयात मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष

०२. मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य

०३. श्री.किशोर मोरे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **(अ) नोंद घेण्याचे विषय.**

**०१. अ) जमाखर्च तक्ता माहे जुलै, ऑगस्ट- २०१२**

**ब) माहे ऑक्टोबर- २०१२ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**(A)** माहे जुलै, ऑगस्ट- २०१२ मधील अनुक्रमे जमा रु.३३,९८,३६,९३४/- व रु.४३,९३,९१,१७५/- आणि खर्च रु. १५,५६,८०,४०७/- व रु.११,६९,८५,८२०/- चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील माहे जुलै, ऑगस्ट- २०१२ मधील अनुक्रमे रुपये २,८८,१२५/- व रुपये १,०१,५५७/- चा तक्ता, संस्थानची गुंतवणूक दिनांक ३१.०७.२०१२ अखेर रुपये ७,०७,६८,९७,४८८/- व दिनांक ३१.०८.२०१२ अखेर रुपये ७,३४,३७,६२,४०८/- चा तक्ता, श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तु यांच्या विक्रीचा माहे ऑक्टोबर- २०१२ मधील रु.१,७२,६७६/- च्या अहवालाच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.८५८ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**०२. श्री साईनाथ रुग्णालयात अपोलो फार्मसी यांना चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्सचे व्यवहारात मे, जुन व जुलै -२०१२ मध्ये झालेल्या उत्पन्नाची नोंद घेणे.**

**(B)** श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये मे.अपोलो फार्मसी, एंटरप्राईजेस लि.,चेन्नई यांना ना नफा ना तोटा तत्वावर चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्स पोटी माहे मे,जुन व जुलै,- २०१२ या महिन्यात अनुक्रमे माहे मे, २०१२ मध्ये रुपये १,८३,०७४/-, जुन- २०१२ मध्ये रुपये १,०६,६३१/- व जुलै-२०१२ मध्ये रुपये- १,४७,९६४/- मात्र रकमेचे देणगी चेक प्राप्त झाले आहेत.

**निर्णय क्र.८५८ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०३. श्री साईबाबा रुग्णालयात अपोलो फार्मसी यांना चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्सचे व्यवहारात मे, जुन व जुलै- २०१२ मध्ये झालेल्या उत्पन्नाची नोंद घेणे.**

**(C)** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये मे.अपोलो फार्मसी, एंटरप्राईजेस लि.,चेन्नई यांना ना नफा ना तोटा तत्वावर चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्स पोटी माहे मे,जुन व जुलै,- २०१२ या महिन्यात अनुक्रमे माहे मे, २०१२ मध्ये रुपये १२,९८,८६७/-, जुन - २०१२ मध्ये रुपये ११,०८,२७५/- व जुलै-२०१२ मध्ये रुपये- १३,३८,२५५/- मात्र रकमेचे देणगी चेक प्राप्त झाले आहेत.

**निर्णय क्र.८५८ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०४. श्री साईनाथ रुग्णालयात माहे सप्टेंबर-२०१२ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान मागणी अर्जाबाबत.**

**(D)** श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये माहे सप्टेंबर-२०१२ मधील रुपये ३९,९२,३००/- मात्र देण्यात आलेल्या अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.८५८ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०५. श्री साईनाथ रुग्णालयात माहे सप्टेंबर-२०१२ मध्ये गरीब रुग्णांना बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

**(E)** साईनाथ रुग्णालयात सप्टेंबर- २०१२ मधील अंतररुग्ण व बाह्यरुग्ण साठी रुपये १,५१,३८३/-, थॅलसेमिया व हिमोफेलिया रुग्णांसाठी रुपये ५५,९५०/- मात्र रकमेची वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.८५८ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०६. माहे सप्टेंबर-२०१२ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

**(F)** माहे सप्टेंबर, २०१२ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या ४६,११७ मनुष्य दिनांच्या कर्मचाऱ्यांच्या/ कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.८५८ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**०७. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ८५८** **(G)** बांधकाम प्रगती तक्ता "ब" ची नोंद घेण्यात येऊन,

**०१.** साईनगर कर्मचारी वसाहत परिसरातील साईचिंतन, साईध्यान, समर्पण व इमारतींच्या भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी मे.एन.एस.बनकर पा. ॲण्ड कं., श्रीरामपूर यांची अंतिम बिलाची रुपये २०,८३,८०१/- मात्र रक्कम मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेऊन आदा करणेत यावी, असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**०२.** साईबाबा भक्तनिवास (५०० रुम) येथील १०० खोल्यांची दुरुस्ती व नुतनीकरण करणेकामी मे.ओरिएंटल कन्स्ट्रक्शन कं., नाशिक यांची अंतिम बिलाची रुपये १,७५,००,०००/- मात्र रक्कम मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेऊन आदा करणेत यावी, असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०२ सन २०१२-१३ (माहे नोव्हेंबर- २०१२ ते मार्च- २०१३ अखेर) या कालावधीसाठी गावरान तुप खरेदीसाठी निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१२-१३ चे माहे नोव्हेंबर-१२ ते मार्च-२०१३ अखेर पाच महिन्यांसाठी प्रसादालय व कॅन्टीन विभागाचे दैनंदिन वापरासाठी आवश्यक किराणा माल खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविणेस मा.त्रीसदस्य समितीचे दि.२५.०८.२०१२ चे सभेतील निर्णय क्र.७१९ अन्वये तत्वतः मान्यता मिळालेली आहे. तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.१६.१०.२०१२ रोजी उपरोक्त कार्यवाहीस मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार दि.२२-२३.१०.२०१२ रोजीचे वर्तमानपत्रात तसेच संस्थाने वेबसाईटवर जाहिर निविदा प्रसिद्ध करुन दि.२२.१०.२०१२ ते दि.३१.१०.२०१२ अखेर शिर्डी कार्यालय व मुंबई कार्यालय येथून निविदा विक्री करण्यात आली आहे. मुदतीअंती शिर्डी कार्यालयातून ५३ व मुंबई कार्यालयातून ०८ अशा एकुण ६१ निविदांची विक्री झालेली होती. निविदा व नमुने स्विकारण्याची अंतिम दि.०१.११.२०१२ अशी होती. त्यानुसार मुदतीअंती ५० निविदा व त्यांचे मालाचे नमुने प्राप्त झालेले आहेत.

त्यामध्ये गावरान तुपासंदर्भात प्राप्त ०९ निविदाधारकांचे लिफाफा नं.०२ दि.०२.११.२०१२ रोजी प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडून त्यामध्ये दिलेल्या कागदपत्राची पडताळणी संस्थानचे लेखाशाखा व संस्थानने नियुक्त केलेल्या प्रि ऑडीटर यांचे मार्फत करण्यात आली. त्यामध्ये कागदपत्रांची पुर्तता न केलेल्या ४ निविदाधारकांची माहिती खालीलप्रमाणे-

१. मे.गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पा.तालुका सह.दुध उत्पा.संघ मर्या., कोपरगांव यांनी डी.डी.ऐवजी Axis Bank Ch.No.२३१६२/२९.१०.२०१२ रु.२०,०००/- मात्रचा चेक जोडलेला आहे. तसेच सन २०१०-११ चा ऑडीट रिपोर्ट जोडलेला आहे.

२. मे.श्री वारणा सहकारी दुध उत्पादक संघ लि.वारणानगर यांनी बयाणा रक्कम भरलेली नाही.

३. मे.दिलीप चिमाजी कालेकर, शिर्डी यांनी बयाणा रक्कमेची मुळ पावती सोबत जोडलेली नाही. दुकान नोंदणी दाखला, मार्केट यार्ड परवाना, वार्षिक उलाढाल दाखला जोडलेला नाही. तसेच इतर कागदपत्रे हे मे.गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पा.ता.सह. दुध उत्पा.संघ मर्या.कोपरगांव यांचे नावाचे जोडलेले आहेत.

४. मे.ओम गुरुदेव एजन्सी, शिर्डी यांनी मार्केट यार्ड परवाना, दुकान नोंदणी दाखला जोडलेला नाही. सदर कागदपत्र दाखल करणेबाबत त्यांना दुरध्वनीद्वारे कळविले होते, मात्र अद्याप त्यांनी कागदपत्रे सादर केलेले नाहीत.

आलेल्या नमुन्यातून योग्य नमुने निवडणेकामी गठीत केलेल्या समितीच्या सदस्यांनी दि.०३.११.२०१२ रोजी खालीलप्रमाणे ३ निविदाधारकांच्या गावरान तुपाची निवड केलेली आहे.

१. मे.प्रभात डेअरी प्रा.लि., टिळकनगर — प्रभात ब्रॅण्ड
२. मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी — सोनाई ब्रॅण्ड
३. मे.पंचामृत डेअरी, मुंबई — पंचामृत ब्रॅण्ड

उपरोक्त निवडलेल्या नमुन्यातील प्रत्येकी ५०० मिली तुप जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, नाशिक येथे तपासणीकामी दि.०७.११.२०१२ रोजी पाठविण्यात आले आहेत.

गावरान तुपासाठी निवडण्यात आलेल्या नमुन्यांच्या तीन निविदाधारकांना आजचे सभेसमोर चर्चा/ वाटाघाटीसाठी उपस्थित रहाणेबाबत कळविण्यात आलेले होते.

आजचे सभेत गावरान तुपासाठी निवड समितीने निवड केलेल्या नमुन्यांच्या तीन निविदाधारकांचे लिफाफा क्र.१ आजचे सभेसमोर समक्ष उघडण्यात येऊन त्याचा तुलनात्मक तक्ता तयार केला तो खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | प्रकार | निविदेतील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|---|
| १ | मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी | सोनाई ब्रॅण्ड | २४,८८५/- | २४,६००/- (व्हॅटसह) |
| २ | मे.पंचामृत डेअरी, मुंबई | पंचामृत ब्रॅण्ड | २४,६७५/- | २४,६००/- (व्हॅटसह) |
| ३ | मे.प्रभात डेअरी प्रा.लि., टिळकनगर | प्रभात ब्रॅण्ड | २७,३००/- | २४,६००/- (व्हॅटसह) |

**निर्णय क्र. ८५९ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१२-१३ (माहे नोव्हेंबर- २०१२ ते मार्च- २०१३ अखेर) या कालावधीसाठी प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागांसाठी लागणारे ४५०० क्विंटल गावरान तुप प्रति क्विंटल रु.२४,६००/- (व्हॅटसह, शिर्डी पोहोच) या निम्नतम दराने उपरोक्त तीनही पुरवठाधारकांकडून समप्रमाणात विभागुन देऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच परिपूर्ण अटी/ शर्ती नमुद करुन संबंधीतांशी त्वरीत करारनामे करुन घ्यावेत.**

**उपरोक्त तीनही पुरवठाधारकांकडून प्रत्येक महिन्यात समप्रमाणात पुरवठा घेणेत यावा. तसेच, प्रत्येक वेळी पुरवठा करणाऱ्या तुपासोबत त्यांचा लॅब तपासणी अहवाल घेण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.०३ ग्रुप ग्रॅच्युटी योजना नुतनीकरण... सन २०१२-१३.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक ४१८ दि.२२-२३/०९/२००१ अन्वये दिनांक ०१ ऑक्टोबर, २००१ पासून संस्थान कर्मचाऱ्यासांठी एल.आय.सी. ग्रुप ग्रॅच्युटी योजना लागु करण्यात आलेली आहे. सदर योजनेचे दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात नुतनीकरण करण्यात येते.

**अ)** नुतनीकरण करताना त्या वर्षाच्या अंशदानाची रक्कम, लाईफ कव्हर प्रिमीयम आदा करण्यात येतो. चालू वर्षासाठी एल.आय.सी.ऑफ इंडीया, पुणे यांनी दि.८.१०.२०१२ चे ई-मेलद्वारे खालीलप्रमाणे रक्कम ग्रुप ग्रॅच्युटी योजनेत डिपॉझिट करणेबाबत कळविलेले आहे.

| Sr. | Premium Details | Amount |
|---|---|---|
| 1 | Current Year Contribution | 1,78,56,277.00 |
| 2 | Life Cover Premium | 16,76,040.00 |
| 3 | Service Tax | 2,07,159.00 |
| 4 | Additional Contribution to Gratuity Fund | 2,95,63,858.00 |
| | **Total Amount Payable** | **4,93,03,334.00** |

**ब)** संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक कोचर ॲन्ड असोसीएटस्, चार्टर्ड अकौंटंट, मुंबई यांनी त्यांचे सन २०११-१२ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण अहवालातील अ.क्र.०५ मध्ये दि.३१.०३.२०१२ अखेर प्रत्यक्ष ग्रॅच्युटी फंडातील शिल्लक रक्कम रु.२१,५५,७१,४१४/- व दि.३१.०३.२०१२ अखेर ग्रॅच्युटीची एकुण रक्कम रु.२५,००,३५,३४३/- यातील फरक रु.३,४४,६३,९२९/- मात्र एल.आय.सी पुणे यांचेकडील ग्रॅच्युटी फंडात गुंतविणेबाबत निर्देशित केलेले आहे.

**क)** उपरोक्त 'अ' व 'ब' मध्ये नमूद केल्याप्रमाणे एल.आय.सी. ऑफ इंडीया, पुणे यांचेकडील ग्रुप ग्रॅच्युटी योजनेचे चालू वर्षाकरीता नुतनीकरण करणेकामी अंशदान, Life Cover Premium (Including Service Tax) व वैधानिक लेखापरिक्षक यांनी सुचविल्याप्रमाणे दि.३१.०३.२०१२ अखेर ग्रॅच्युटी फंडात कमी जमा दिसत असलेली रक्कम, डिपॉझिट म्हणून एलआयसी ऑफ इंडीया, पुणे यांचेकडे जमा करणे आवश्यक आहे. ग्रुप ग्रॅच्युटी योजनेअंतर्गत जमा असलेले रकमेवर एल.आय.सी. ऑफ इंडीया, पुणे यांचेकडून दरवर्षी **९.४०%** या दराने संस्थानला व्याज मिळते. चालू वर्षाचे नुतनीकरणाकरीता खालीलप्रमाणे रक्कम ग्रुप ग्रॅच्युटी योजनेत डिपॉझिट करण्यात यावी असे नम्र मत आहे.

| Sr. | Premium Details | Amount |
|---|---|---|
| 1 | Current Year Contribution | 1,78,56,277.00 |
| 2 | Life Cover Premium *(Including Service Tax)* | 18,83,199.00 |
| 3 | Difference between Gratuity amount & Gratuity Fund (*As* | 3,44,63,929.00 |

| | | |
|---|---|---|
| | *per audit report)* | |
| | **Total Amount Payable** | **5,42,03,405.00** |

**R/O 5,40,00,000.00**

**ड)** उपरोक्त रक्कम ही योजनेचे नुतनीकरण होण्यासाठी दि.३१.१०.२०१२ अखेर भरणे आवश्यक आहे. अन्यथा योजनेचे नुतनीकरण LIC of India, पुणे यांना रक्कम प्राप्त झालेनंतर होईल. या कालावधीत एखाद्या कर्मचाऱ्याचे आकस्मीक निधन झाल्यास त्या कर्मचाऱ्याला या योजनेचा लाभ मिळणार नाही व तो या लाभापासून वंचीत होईल.

सदर रक्कम ही संस्थानच्या ग्रुप ग्रॅच्युटी या योजनेमध्ये संथानच्या नांवे डिपॉझीट होत असून त्यावर संस्थानला ९.४० % या दराने दरवर्षी व्याज मिळते. हा संस्थानचा खर्च नसुन सदर रक्कम डिपॉझीट म्हणुन LIC कडे ठेवण्यात येते.

तरी वर नमुद केल्याप्रमाणे पुर्णांकित रक्कम रु.५,४०,००,०००/- (अक्षरी रुपये पाच कोटी, चाळीस लाख रुपये मात्र) एल.आय.सी. ऑफ इंडीया, पुणे यांचेकडे RTGS द्वारे आदा करणेस मान्यता मिळणेकामी सादर.

**निर्णय क्र. ८६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, ग्रुप ग्रॅच्युटी योजना सन २०१२-१३ नुतनीकरणासाठी पुर्णांकित रक्कम रु.५,४०,००,०००/- मात्र एल.आय.सी. ऑफ इंडीया, पुणे यांचेकडे RTGS द्वारे आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.०४** **गुंतवणूकीविषयी निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** माहे नोव्हेंबर, २०१२ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १) | बॅंक ऑफ बरोडा, नासिक | ४/११/२०१२ | ३,५८,८३,१४६/- |
| २) | बॅंक ऑफ बरोडा, नासिक | ४/११/२०१२ | ७,१७,६६,२९२/- |
| ३) | बॅंक ऑफ बरोडा, नासिक | ५/११/२०१२ | ४,४०,२७,७२९/- |
| ४) | बॅंक ऑफ बरोडा, नासिक | ८/११/२०१२ | १,१०,०६,९३२/- |
| ५) | सेंट्रल बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी | ८/११/२०१२ | ९,४९,३३,२५०/- |
| ६) | सेंट्रल बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी | ११/११/२०१२ | ८,२५,६८,११२/- |
| ७) | बॅंक ऑफ बरोडा, नासिक | ११/११/२०१२ | ९,११,०८,८५०/- |
| ८) | बॅंक ऑफ बरोडा, नासिक | १४/११/२०१२ | ६,०५,५५,८६०/- |
| ९) | आंध्र बॅंक, शिर्डी ( NPAY ) | १४/११/२०१२ | ३०,७३,९७४/- |
| १०) | किसान विकास पत्र ( श्रीरामपूर ) | १५/११/२०१२ | २,००,००,०००/- |
| ११) | आंध्र बॅंक, शिर्डी ( NPAY ) | २६/११/२०१२ | २६,१९,९०१/- |
| १२) | सेंट्रल बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी | २६/११/२०१२ | ३७,४६,०१,१९५/- |
| १३) | दैनंदिन खर्च वजा जाता माहे नोव्हेंबर २०१२ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | १०,००,००,०००/- |
| | | **एकूण रक्कम -** | **९९,२१,४५,२४१/-** |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम रु. ९९.२१ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

तथापि अ.नं. ९ व ११ आंध्र बॅंक, शिर्डी यांचेकडील नित्यप्रसादालय अन्नदान योजनेतील रक्कम ही सदर योजनेतील तरतुदीनुसार त्यांचेकडेच गुंतवावी लागणार आहे. त्यामुळे सदरची रक्कम वजा जाता उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बॅंकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बॅंकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बॅंकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बॅंकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

१ ) आंध्र बॅंक, शिर्डी
२) बॅंक ऑफ बरोडा, नासिक
३) बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी
४) कॅनरा बॅंक, शिर्डी
५) सेंट्रल बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी
६) कॉर्पोरेशन बॅंक, शिर्डी

७) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
८) युको बँक, शिर्डी
९) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
१०) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
११) विजया बँक, शिर्डी
१२) युनायटेड बँक ऑफ इंडीया, शिर्डी

तरी अ.नं. १ ते १२ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु. ९९.२१ कोटीची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी सदरचा विषय मा.त्रिसदस्य समितीच्या सभेत मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र. ८६१ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अ.नं. १ ते १२ या बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु. ९९.२१ कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शाखा शिर्डी, इंडियन बँक, शाखा शिर्डी आणि ओरीएंटल बँक, शाखा शिर्डी या बँकांमध्ये संस्थानची गुंतवणूक करणेबाबत त्यांचे अर्ज आलेले आहेत. सदर बँका राष्ट्रीयकृत असल्याने नवीन खाते उघडून त्यांचेकडूनही गुंतवणूकीसाठी व्याजदर घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

## दि.०८.११.२०१२ चे सभेतील निर्णय-

**विषय नं.०५ लेखाशाखेत प्राप्त देयकांच्या पुन:मंजूरीबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या विविध विभागातुन देयेक आदा करण्यासाठी लेखाशाखेत प्रस्तावित करण्यात येतात. यापैकी दि.७ नोव्हेंबर २०१२ अखेर प्रलंबित असलेल्या देयकांचा तपशील खालीलप्रमाणे-

**(अ)**

| अ.नं | विभाग | पुरवठादाराचे नाव | तपशिल | देय रक्कम | मा.व्यवस्थापन समिती निर्णय क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | विदयुत विभाग | मे.सिमेन्स इंटरप्रायझेस.प्रा.लि. मुंबई | दुरध्वनी यंञणा वार्षिक सव्हिस कॉन्ट्रक्ट | १,३९,६२५=०० (६ महिने करिता) | ५६३<br>१४/०७/२०१२ |
| २ | खरेदी विभाग | मे.राहुल इंटरप्रायझेस नाशिक | माक्याचे खादयतेल ऐवजी सुर्यफुल तेल पुरवठा | २२,०७,२५०=०० | ३९९<br>३०/०५/२०१२ |
| ३ | विदयुत विभाग | मे.साई इंजिनिअर्स नाशिक | शांतीनिवास जवळील दर्शनलाईन करिता रॅलिंग पुरवठा | ८,०७,५२५=०० | २८१<br>६/०४/२०१२ |
| ४ | बांधकाम विभाग | के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.हैद्राबाद | लेसर विझन-गार्डन इमारत बांधकाम बाबत... | २१,५४८९८=०० | ४९६<br>२४/०७/२०१२ |
| ५ | बांधकाम विभाग | स्पेस वुड फर्निचर प्रा.लि.नागपुर | साईआश्रमसाठी एम.एस.बेडखरेदी व पुरवठा | १९,५५,२००=०० | ४९७<br>२४/०७/२०११ |
| ६ | विदयुत विंभाग | कोने इनिव्हेटर इंडिया प्रा.लि.पुणे | व्दारावती इमारतीमध्ये कार्यरत असलेल्या लिप्टच्या वार्षीक सव्हिस कॉन्ट्रक्ट बाबत... | ५,३४,४०८=०० | ४६८<br>१५/०९/२०१२ |
| ७ | खरेदी विभाग | इंदापुर डेअरी ॲन्ड मिल्क प्रॉडक्ट लि.गोखळी | प्रसादालयासाठी गावरान तुप खरेदी | १,११,९८,२५०=०० | ७२१<br>२५/०८/२०१२ |
| ८ | संरक्षण विभाग | व्हेंटेज इंटीग्रेटेड सिक्यरीटी सोल्युशन प्रा.लि.नाईडा. | सुरक्षा साहित्य (कॅमेरा, वायरींग व इतर) मटेरीयलचे उर्वरित ३०% रक्कम आदायगी बाबत. | १,२८,६७,५३३=०० | ७७२<br>२२/९/२००७<br>७९३<br>१८/१०/२००८<br>२८३<br>६/३/२०१० |

त्याचप्रमाणे शासन निर्णय क्रमांक सासंवि२००७/२४२/(६०)-कां.सोळा दि.१६.०७.२००९ अन्वये संस्थानमधील कर्मचा-याच्या पाल्यांना शैक्षणिक शुल्क परतावा देण्यात येत आहे.या बाबत थोडक्यात मागिल दोन वर्षाचा तपशिल व चालु शैक्षणिक वर्षाकरिता खालील प्रमाणे-

**(ब)**

| तपशील | सन २०१०-२०११ | सन २०११-२०१२ | सन २०१२-२०१३ अदयाप देणे आहे |
|---|---|---|---|
| अदा केलेली रक्कम रुपये | २५,४८,०४१ | २३,८३,५७८ | १९,१४,८३४ |
| सवलत (सस्थांनच्या शाळा) | ०० | ११,४५,७०० | १२,५०,६०० |
| शैक्षणिक फी परतावा एकुण खर्च रु. | २५,४८,०४१ | ३५,२९,२७८ | ३१,६५,४३४ |

तरी उपरोक्त अ व ब देयकांबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८६२ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे (अ) मधील अ.नं.१,२,३,६,७ यांची देय रक्कम अदा करण्यात यावी. तसेच अ.नं. ४,५,८ यांना देय असलेल्या रकमेबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठापुढे संस्थानचे वकीलामार्फत अर्ज सादर करणेत यावा, व त्यांचे मान्यतेनंतर रक्कम अदा करण्यात यावी, असे ठरले.**

**तसेच (ब) मधील संस्थान कर्मचाऱ्यांचे पाल्यांचा शैक्षणिक शुल्क परतावा हा शासन निर्णय क्रमांक सासंवि२००७/२४२/(६०)-कां.सोळा दि.१६.०७.२००९ अन्वये आदा करणेत येत असतो. उपरोक्त शासन निर्णयानुसार सन-२०१२-१३ चा संस्थान कर्मचाऱ्यांचे पाल्यांचे शैक्षणिक शुल्क परताव्यासाठी अपेक्षित रु.३१,६५,४३४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**याचवेळी चर्चेत असेही ठरले की, संस्थानचे श्री साईप्रसादालय, मंदिर व कॅन्टीन विभागांसाठी आवश्यक असणारे धान्य, किराणा माल, भाजीपाला इ.चे खरेदीसाठी दि.३१.०३.२०१३ पर्यंतचे कालावधीसाठी मा.औरंगाबाद खंडपीठाची मान्यता मिळालेली आहे. तसेच संस्थानचे रुग्णालयांसाठी १ वर्ष कालावधीकरीता आवश्यक असणाऱ्या औषधांचे खरेदीसाठी मा.औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात येत आहे. या खर्चाशिवाय संस्थानचे आस्थापनेवरील विविध विभागांतर्गत भक्तांना सोयी-सुविधा पुरविणेकामी नेमलेल्या कायम कर्मचारी व कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने/ आऊट सोर्सिंग पध्दतीने दैनंदिन कामास घेण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांचे मासीक वेतन, संस्थान रुग्णालयातील वैद्यकिय अधिकारी यांना देण्यात येणारे मासीक मानधन, तसेच, मासिक विद्युत बीले इ. संबंधीत बीले संस्थानचे प्रचलीत पध्दतीने आदा करण्यात यावीत.**

**परंतु, उपरोक्त नमूद केलेल्या कारणांसाठींच्या बीलांशिवाय अन्य सर्व कारणांसाठीचे रु.१०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख) मात्र किंवा त्यापुढील खर्चाचे सर्व बीलांना मा.व्यवस्थापन समिती सभेचे पूर्व मान्यतेने मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेऊन, त्यांनतरच बीले पारीत करणेत यावीत, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.०६** **साईभक्तांचे निवासांसाठी उभारणेत आलेल्या साईआश्रम प्रकल्पाचे उद्‌घाटनासाठी मा.राष्ट्रपती, भारत गणराज्य यांचे नियोजित शिर्डी भेटीकरीता मौजे निमगाव कोऱ्हाळे गट नं.१९५ मधील संस्थानच्या हेलिपॅडचे विस्तारीकरण करणे, मंडप उभारणी व इतर आवश्यक कामे करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईंचे दर्शनार्थ येणाऱ्या साईभक्तांसाठी संस्थानतर्फे दर्शन, निवास, प्रसाद भोजन इत्यादी सुविधा उपलब्ध करण्यात येतात. तथापी शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांच्या गर्दीत दिवसेंदिवस वाढ होत असल्याने सध्याची निवासव्यवस्था अपुरी पडत आहे. त्यासाठी साईभक्तांना शिर्डी येथे आल्यानंतर निवासाची व्यवस्था सहजरित्या विनाविलंब उपलब्ध व्हावी याकरीता नविन भक्तनिवास इमारतींचे बांधकाम करणे संस्थान व्यवस्थापन समितीचे विचाराधीन होते.

दानशूर साईभक्त मा.श्री. के.व्ही.रमणी संस्थापक-तथा-कार्यकारी विश्वस्त शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी दि.२४/११/२००५ चे पत्राव्दारे साईभक्तांसाठी भक्तनिवास इमारतींचे बांधकाम त्यांचे ट्रस्टतर्फे देणगीदाखल करुन देणेची तयारी असलेबाबतचा प्रस्ताव संस्थानकडे सादर केला होता. त्यावर दि.१८/१२/२००५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेत सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र.७८३ अन्वये संस्थानतर्फे जागा उपलब्ध करुन देणे व बांधकामाचा सर्व खर्च शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी करणे यासाठी आवश्यक करारनामा करुन घेण्यात यावा असे ठरले. त्यानुसार संस्थान व शिर्डी साई साई ट्रस्ट, चेन्नई यांचे दरम्यान दि.०४/०२/२००६ रोजी करारनामा (MOU) करण्यात आला आहे. त्यानुसार " साई आश्रम" या भक्तनिवास प्रकल्पातील इमारतींचे बांधकाम शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी पूर्ण केले आहे. तसेच संस्थानतर्फे करण्यात येत असलेले परिसर विकासाचे कामही आता पूर्णत्वाचे टप्प्यावर आहे.

यापैकी साई आश्रम भाग-१ चे बांधकाम मौजे शिर्डी येथील संस्थान मालकीचे सर्व्हे नं. १०७,१०८ व १०९ पै. मधिल ५ हे. ८० आर १७ चौ.मी. क्षेत्रफळाचे भूखंडावर करण्यात आलेले आहे. त्यामधिल एकूण १२ निवासी इमारतींमधील १५३६ खोल्यांची निवास क्षमता ६१४४ व्यक्ती इतकी आहे. तसेच साई आश्रम भाग-२ चे बांधकाम मौजे निमगांव कोऱ्हाळे येथिल संस्थान मालकीचे गट नं.१७२ मधिल ६ हे.७९ आर क्षेत्राचे भूखंडावर करण्यात आलेले आहे. त्यामधिल एकूण ०६ निवासी इमारतींमधील १९२ हॉल्सची निवासक्षमता ३४५६ व्यक्ती इतकी आहे.

सदर प्रकल्पाचे उद्‌घाटन मा. राष्ट्रपती, भारत गणराज्य, यांचे शुभ हस्ते दि.१६/११/२०१२ रोजी नियोजीत आहे. कार्यक्रमाचे पूर्व तयारी करीता दि.१९/१०/२०१२ रोजी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर मा. पोलीस अधिक्षक, अहमदनगर, मा. कार्यकारी अधिकारी, मा. अधिक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, अहमदनगर व इतर अधिकाऱ्यांनी हेलीपोर्ट, रस्ते व कार्यक्रम स्थळाची पाहणी केली. यावेळी उद्‌घाटन कार्यक्रमाकरीता मा. राष्ट्रपती यांचे हेलीकॉप्टर संस्थानचे मौजे निमगांव - कोऱ्हाळे येथील गट नं. १९५ मधे केलेल्या हेलीपोर्टवर उतरविणेसाठी सदर हेलीपॅडचे, विस्तारीकरण करणेबाबत सुचना दिल्या. तसेच तेथिल विश्राम कक्षास रंगकाम करणे, टॉयलेट दुरुस्ती इ. कामे करण्यास सांगितले आहे. याप्रमाणे हेलीपॅडचे विस्तारीकरण, विश्राम कक्षाचे रंगकाम व दुरुस्ती, कार्यक्रम स्थळावर मंडप उभारणी इत्यादी कामांसाठी अपेक्षित असलेल्या अंदाजे खर्चाचा तपशिल खालिलप्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **कामाचा तपशिल** | **रक्कम (रु. लाखात)** |
|---|---|---|
| ०१ | हेलीपॅडचे विस्तारीकरण करणे व तेथिल विश्राम कक्षास रंगकाम, टॉयलेट दुरुस्ती इ. | ६३.०० |
| ०२ | मंडप, स्टेज, बॅरीकेडींग, स्वागत कमानी उभारणे, बोर्ड बॅनर्स तयार करणे. | ७.०० |
| ०३ | विद्युत रोषणाई व पुष्पसजावट खर्च | ४.५० |

| | | |
|---|---|---|
| ०४ | निमंत्रण पत्रिका, माहितीपत्रके छपाई, मान्यवरांचे सत्कार, निवेदक, भोजन, निवास इ. | २.५० |
| | **एकूण अपेक्षित अंदाजे खर्च :-** | **रु.७७.०० लक्ष** |

मा. त्रिसदस्य समितीचे दि.०८/१०/२०१२ रोजीचे सभेतील निर्णयान्वये वरीलपैकी मंडप, स्टेज, निमंत्रण पत्रिका, बोर्ड व इतर अनुषंगिक सेवांसाठी रु.१२ लक्ष मात्रचे अपेक्षित अंदाजे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. तरी त्यासह वरीलप्रमाणे येणारे एकूण रु.७७.०० लक्ष मात्रचे अपेक्षित अंदाजे खर्चास मान्यता मिळणेस विनंती. तसेच हेलीपॅड विस्तारीकरणाचे काम अत्यंत तातडीने पूर्ण होणे आवश्यक असल्याने सदर काम हे ठेकेदार मे.एस.के.येवले ॲण्ड कं., संगमनेर यांचेकडून त्यांचे चारी नं.११ रस्त्याचे कामासाठी मंजूर असलेल्या निविदा दराने करुन घेण्यास मंजुरी मिळणेस विनंती. तसेच अनुषंगीक बाबी करावयाचे असतील त्यासाठी विद्यमान डी.एस.आर (सन २०११-२०१२) दराने करुन घेता येईल. तरी सदरची बाब मान्यतेस्तव सविनय सादर. तसेच इतर सर्व कामे विहीत पद्धतीने कोटेशन्स मागवून करणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ८६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांचे निवासांसाठी उभारणेत आलेल्या साईआश्रम प्रकल्पाचे उद्‌घाटनासाठी मा.राष्ट्रपती, भारत गणराज्य यांचे नियोजित शिर्डी भेटीकरीता मौजे निमगाव कोऱ्हाळे गट नं.१९५ मधील संस्थानच्या हेलिपॅडचे विस्तारीकरण करणेकामी मे.एस.के.येवले ॲण्ड कं., संगमनेर यांचेकडून चारी नं.११ या रस्त्याचे कामासाठी मंजूर असलेल्या निविदा दराने करुन घेण्यास तसेच त्या विषयक अनुषंगीक बाबी करावयाचे असतील त्यासाठी विद्यमान डी.एस.आर (सन २०११-२०१२) चे दराने करुन घेणेस व प्रस्तावात नमूद केलेली इतर सर्व कामे विहीत पद्धतीने कोटेशन्स मागवून करुन घेणेस आणि याकामी येणाऱ्या रु.७७,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** ( कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०७** **मौजे निमगांव कोऱ्हाळे, तालुका राहाता गोदावरी उजवा तट कालवा चारी क्र.११ वरुन रस्ता विकसीत करणे कामाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि., पुणे (UPMPL) यांचे वाढीव कालावधीतील फी बाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८/१०/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७६९ नुसार मौजे निमागांव कोऱ्हाळे शिवरातील गोदावरी उजवा तट कालवा चारी क्र.११ (अहमदनगर- मनमाड रामा-१० ते कालवा हेडपर्यंत लांबी २ किमी) पाईप टाकून बंदिस्त करणेस व त्यावरुन १२ मीटर रुंदीचा रस्ता संस्थान निधीतून विकसीत करणेस मान्यता मिळालेली आहे.

विषयांकीत चारी क्र.११ वरुन रस्ता विकसीत करणेसाठी बांधकाम आराखडे व अंदाजपत्रक तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापन करणेकामी मे.युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि., पुणे (UPMPL) यांची नियुक्ती करणेत आली आहे. याकामी त्यांनी संस्थानमार्फत विकसीत करावयाचे ०६ रस्त्यांसाठी देणेत येणारे सल्लागार शुल्काप्रमाणे प्रकल्पाचे किंमतीच्या २.५% रक्कम (अधिक प्रचलित दराने सर्व्हीस टॅक्स) या शुल्कावर नेमणूक करणेत आलेली आहे. याकामी त्यांचेशी केलेल्या करारनाम्यानुसार त्यांना खालील टप्प्यांनुसार फी अदा करावयाची आहे. तसेच त्यापैकी आजपावेतो अदा करण्यात आलेल्या फीचा तपशिलही खालिल तक्त्यात दर्शविला आहे.

1.Helipad Link Road Civil Work Contract Amount= Rs.6,60,81,150/- (A)
2.Total Fees payable to Consultant @ 2.5% of (A)= Rs.16,52,029/- (B)

| S.No | Stage | % of Fees Payable | Total Fees Payable | Paid up to date |
|---|---|---|---|---|
| 1 | Stage-1: After completion of entire tendering process and issue of LOA the selected bidder. | 15% | 247,804.00 | 247,804.00 |
| 2 | Stage-2A: During the progress of work at Rs.91779/- per month, for 9 months from 01/06/2011 to 29/02/2012. | 50% | 826,011.00 | 826,011.00 |
| 3 | Stage-2B: Progressively pro-rata with the contractors running bills. (Work done ÷ contract amount) x total fees payable x 25% | 25% | 413,007.00 | 99,422.00 |
| | Total: | | 1,486,822.00 | 1,173,237.00 |
| | Retention Amount @ 10%: | | 165,207.00 | 0.00 |
| | Total Amount Payable: | | 1,652,029.00 | 1,173,237.00 |

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेप्रमाणे सल्लागार यांना Stage २ A नुसार कामाचे मूदतीत जून २०११ ते फेबुवारी २०१२ या ०९ महिन्यांचे कालावधीसाठी रु.९१,७७९/- प्रती महिना अधिक सर्व्हीस टॅक्स याप्रमाणे फी अदा करणेत आलेली आहे. प्रत्यक्षात ठेकेदार मे.एस.के.येवले यांना काम पूर्ण करणेस चारीच्या पाण्याचे आवर्तन इत्यादी कारणांमुळे विलंब झाला आहे. त्यामुळे सदरचे काम ०९ महिन्याचे मूदतीत पूर्ण होऊ शकलेले

नाही. दि.१५/०९/२०१२ रोजी झालेल्या मा.त्रिसदस्य समितीचे सभेत ठेकेदार मे.एस.के.येवले यांना दि.३१/१२/२०१२ अखेर पर्यंत मूदतवाढ मंजूर करण्यात आली आहे.

सल्लागार मे.युनिसन यांना एकुण देय फि रु.१६,५२,०२९/- मात्र पैकी आजपावेतो रु.११,७३,२३७/- मात्र इतकी रक्कम अदा करण्यात आलेली आहे. उर्वरित फिची रक्कम त्यांना कामाचे प्रगतीनुसार अदा करण्यात येणार आहे. तसेच बिलातून राखून ठेवण्यात येणाऱ्या १०% रकमेपैकी ५०% रक्कम अंतिम बिल सर्टिफाय केलेनंतर व उर्वरित ५०% रक्कम ठेकेदार यांचा दोषदायीत्व कालावधी संपलेनंतर अदा करावयाची आहे. अशाप्रकारे मे.युनिसन यांना संपूर्ण प्रकल्पाकरिता ठरल्याप्रमाणे प्रकल्पाच्या किंमतीचे २.५०% इतकी फी अदा करण्यात येणार आहे. तथापी प्रकल्पाचे काम पूर्ण करणेस विलंब झाल्याने मार्च- २०१२ ते डिसेंबर- २०१२ अखेर दहा महीने व अंतिम बिल तपासणीसाठी एक महीना याप्रमाणे एकुण अकरा महीन्यांचे वाढीव कालावधीत सल्लागार यांना त्यांचा साईटवरील स्टाफ ठेवावा लागणार आहे. त्यासाठी सल्लागार यांना प्रती महीना ठरावीक मानधन अदा करावे लागेल.

सल्लागार यांनी त्यांचे दि.०१/०८/२०१२ रोजीचे पत्राने सदर कामासाठी वाढीव कालावधीत कर्मचाऱ्यांचे वेतन व इतर अनुषंगिक खर्च भागविणेसाठी माहे मार्च ते जून या चार महिन्यांचे रु.९१,७७९/- प्रती महिना (अधिक सर्व्हीस टॅक्स) प्रमाणे फी मिळणेस विनंती केली आहे. UPMPL यांचेकडील श्री.व्ही.के.देशपांडे, MD व श्री.एम.एस.किरनाळी, Director Projects यांनी दि.३०/०७/२०१२ रोजी शिर्डी येथे येऊन त्यांचे फी मागणीबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा केली. त्यावेळी सल्लागार यांनी Stage-२A करीता रु.९१,७७९/- मात्र प्रती महीना (अधिक सर्व्हीस टॅक्स) प्रमाणे माहे मार्च-२०१२ ते जून-२०१२ या चार महीन्यांकरीता सादर केलेली बिले त्यांना अदा करणेबाबत प्रस्ताव सादर करावा अशी चर्चा झाली. UPMPL यांनी वाढीव कालावधीतील मासिक मानधनापोटी आजपावेतो खालिलप्रमाणे बिले सादर केलेली आहेत.

| S.No | Invoice No. | Invoice Date | Month | Net Amount | Service Tax | Gross Bill Amount |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | P120402 | 04/04/2012 | March-2012 | 91,779 | 11,344 | 103,123 |
| 2 | P120502 | 07/05/2012 | April-2012 | 91,779 | 11,344 | 103,123 |
| 3 | P120602 | 08/06/2012 | May-2012 | 91,779 | 11,344 | 103,123 |
| 4 | P120702 | 07/07/2012 | June-2012 | 91,779 | 11,344 | 103,123 |
| 5 | P120903 | 20/09/2012 | August-2012 | 100,000 | 12,360 | 112,360 |
| | | | | | TOTAL : | 524,852 |

प्रकल्पाचे मूळ कालावधीदरम्यान UPMPL यांना अदा करण्यात येणारी रु.९१,७७९/- मात्र इतकी मासिक फी ही एकुण फीच्या ५० % रक्कम समान ९ मासिक हप्त्यांमध्ये विभागलेली होती. म्हणजेच सल्लागार यांना साईटवरील स्टाफसाठी येणाऱ्या खर्चाचा त्याचेशी संबंध नव्हता. त्यामुळे सल्लागार यांना वाढीव कालावधीसाठी साईटवरील स्टाफ इत्यादीसाठी येणारा खर्च विचारात घेऊन खालिलप्रमाणे मानधन ठरविता येईल.

| S.No | Particulars | Amount | Remarks |
|---|---|---|---|
| A | Monthly Salary of Site Staff: | | |
| 1 | Resident Engineer- 01 | 25,000 | Only 50% salary is accounted as the same engineer is working for Shirdi Road development also. |
| 2 | Site Engineer- 01 | 30,000 | |
| B | Head Office Back-up & Overheads (Monthly) | 20,000 | Considering one site visit by Director Projects and HO Back-up. |
| | TOTAL: | 75,000 | All amounts are approximate. |

तरी वरील विषयांकीत प्रकल्पासाठी वाढीव कालावधीत प्रकल्प व्यवस्थापन सेवा पुरविणेकरीता सल्लागार मे.युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि., पुणे यांना मार्च- 2012 ते जानेवारी- 2013 अखेरपर्यंत 11 महीन्यांचे कालावधीसाठी प्रती महीना रु.75,000/- मात्र प्रमाणे एकुण रु.8,25,000/- मात्र इतकी (यापुर्वी ठरलेल्या प्रकल्पाच्या किंमतीचे 2.50% फी व्यतिरिक्त) फी अधिक प्रचलित दराने सर्व्हीस टॅक्स अदा करणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र. ८६४ यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव कोऱ्हाळे, तालुका राहाता गोदावरी उजवा तट कालवा चारी क्र.११ वरुन रस्ता विकसीत करणे कामाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि., पुणे (UPMPL) यांना मार्च- २०१२ ते जानेवारी- २०१३ अखेरपर्यंत ११ महीन्यांचे कालावधीसाठी प्रती महीना रु.७५,०००/- मात्र प्रमाणे एकुण रु.८,२५,०००/- मात्र इतकी (यापुर्वी ठरलेल्या प्रकल्पाच्या किंमतीचे २.५०% फी व्यतिरिक्त) फी अधिक प्रचलित दराने सर्व्हीस टॅक्स अदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०८ साई आश्रम प्रकल्पातील खोल्या मिळणेबाबतची विनंती मागे घेत असलेबाबत श्री.के.व्ही.रमणी, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१२ रोजीचे पत्र.**

**प्रस्ताव-** विषयाची पूर्वपीठीका:

**(अ)** शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई या संस्थेचे मा. कार्यकारी विश्वस्त श्री. के. व्ही. रमणी यांनी दिनांक २४ नोव्हेंबर, २००५ रोजीचे पत्राव्दारे श्री साईंचे दर्शनासाठी शिर्डी येणाऱ्या भक्तांसाठी त्यांचे आर्थिक

सहाय्यातून निवासव्यवस्था उपलब्ध करुन देणेबाबत विनंती प्रस्ताव सादर केला होता. श्री. रमणी यांचा सदरचा विनंती प्रस्ताव तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १८ डिसेंबर, २००५ रोजीचे सभेत विचारार्थ सादर करणेत आला होता. त्यावर सदरहू सभेतील निर्णय क्रमांक ७८३ नुसार, शिर्डी साई ट्रस्ट, पट्टीपुलम, तामिळनाडू यांना संस्थानतर्फे जागा उलब्ध करुन देणे व बांधकामाचा सर्व खर्च शिर्डी साई ट्रस्ट, पट्टीपुलम, तामिळनाडू यांनी करणे, सदर बाबतीत मालकी हक्क संस्थनचा राहील. दुरुस्ती व देखभाल, प्रशासन सर्व जबाबदारी संस्थानची राहील यासाठी आवश्यक करारनामा करुन घेण्यात यावा, असा निर्णय घेणेत आलेला होता. सदर निर्णयानुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमध्ये दिनांक ०४ फेब्रुवारी, २००६ रोजी सामंजस्य करार (Memorandum of Understanding) करण्यात आला.

संस्थान व शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमध्ये वरीलप्रमाणे झालेल्या सामंजस्य करारानुसार, संस्थान मालकीची मौजे शिर्डी हद्दीतील सर्व्हे नंबर १०७ पै, १०८ पै व १०९ पै मधील व मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीतील गट नंबर १७२ पैकी मधील खुली जमीन / जागा शिर्डी साई ट्रस्ट, पट्टीपुलम, चेन्नई यांना साई आश्रम प्रकल्प भाग १ व भाग २ चे बांधकामासाठी उपलब्ध करुन देणेत आली.

सामंजस्य करारातील तरतुदीनुसार, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमार्फत साई आश्रम प्रकल्प भाग १ व भाग २ ची या निवासस्थाने इमारतींची बांधकामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करणेत येऊन, त्यांचेमार्फत बांधकाम ठेकेदार म्हणून मे. पार्श्वनाथ डेव्हलपर्स लि., नवी दिल्ली यांची नेमणूक करणेत आली. नियुक्त करणेत आलेल्या बांधकाम ठेकेदार प्रकल्पाचे प्रत्यक्ष बांधकामास दिनांक १० जानेवारी, २००८ रोजी सुरुवात करणेत आली. दरम्यानचे कालावधीत, संस्थानमार्फत साई आश्रम प्रकल्पाचे परिसर विकासाची कामे करणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागवुन, मे. शापूरजी पालोनजी ॲण्ड कं. लि., नाशिक यांची बांधकाम ठेकेदार म्हणून नियुक्ती करणेत आली. सद्य :स्थितीत साईआश्रम प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण झालेले असून, किरकोळ कामे अंतिम टप्प्यात आहेत.

**(ब)** दरम्यानचे कालावधीत, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई चे मा. कार्यकारी विश्वस्त श्री. के. व्ही. रमणी यांनी त्यांचेकडील दिनांक १२ एप्रिल, २०१० रोजीचे पत्राने अशी विनंती केली की, .. .. साई आश्रम भाग १ व भाग २ मधील इमारतीचे बांधकामांपैकी ०५ ते ०७ टक्के क्षेत्र मिळावे. शक्यतो साई आश्रम भाग १ मधील एक इमारत ट्रस्टचे वापरासाठी व ट्रस्टचे कार्यालय सुरु करणेसाठी मिळावी. समझोता करारनाम्यानुसार सदर इमारतीची मालकी संस्थानचीच राहील. संस्थानने मान्यता दिल्यास सदर इमारतीतील खोल्यांचे वाटप व वापर याचे नियंत्रण शिर्डी साई ट्रस्ट मार्फत करणेत येईल. तसेच संस्थानने कळविल्यास ट्रस्टचे वापरासाठी देण्यात आलेल्या इमारतीचे देखभाल दुरुस्तीचा आकार ट्रस्टमार्फत आदा करणेत येईल.

शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे उपरोक्त विनंती पत्राचे अनुषंगाने तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १० ऑक्टोबर, २०१० रोजीचे सभेत सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, निर्णय क्रमांक ७९७ नुसार असा निर्णय घेणेत आला की, .. साईआश्रम प्रकल्पाचे देणगीदार साईभक्त मा. श्री. के. व्ही. रमणी, कार्यकारी विश्वस्त, शिर्डी साई ट्रस्ट, पट्टीपुलम, चेन्नई (तामिळनाडू) यांना साईआश्रम प्रकल्प भाग १ मधील २० खोल्या संस्थान निश्चित करील ते स्वच्छता व देखभाल शुल्क भरणेचे अटीवर, त्यांचे ट्रस्टमार्फत येणाऱ्या भक्तांसाठी शिर्डी साई ट्रस्टमार्फतच वाटप व वापर करणेस, तसेच त्यांचे ट्रस्टचे कार्यालय सुरु करणेसाठी देण्यात यावे.

उपरोक्त निर्णयास, तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे एक सदस्य डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर यांनी दिनांक १८ नोव्हेंबर, २०१० रोजीचे पत्राने विरोध दर्शविला. सदर पत्रात नमुद केलेल्या मुद्दयांबाबत मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक २९ जानेवारी, २०११ रोजीचे पत्राने सविस्तर माहिती सादर करावी, असे कळविले.

मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी विचारणा केलेनुसार, इकडील दिनांक १५ एप्रिल, २०११ रोजीचे पत्राने, तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १० ऑक्टोबर, २०१० रोजीचे सभेतील निर्णयाबाबतची पार्श्वभूमी कळवून, अधिनियमातील तरतुदीनुसार मा. शासनाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत येईल व मा. शासनाची मान्यता प्राप्त झालेनंतरच सदरचे निर्णयाची अंमलबजावणी करणेत येईल, असे कळविणेत आलेले आहे.

**(क)** आता, शिर्डी साई ट्रस्ट, पट्टीपुलम, चेन्नई चे मा. कार्यकारी विश्वस्त श्री. के. व्ही. रमणी यांनी त्यांचेकडील मा. अध्यक्षसो., त्रिसदस्यीय समिती यांना अग्रेषित केलेल्या दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१२ रोजीचे पत्राने खालीलप्रमाणे कळविले आहे :

.. .. We now withdraw unconditionally, our request for rooms for the stay of devotees referred by us and office space for maintenance, s we would like to strictly follow the MoU dated 4th February 2006 signed between Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi (Sansthan) and Shirdi Sai Trust, Chennai (SST).

.. .. We do not wish to have any rooms reserved for us in Sai Ashram 1 & 2 any purpose. If any devotees are coming from here requesting for accommodation, we will refer them to book directly through Sansthan or on Internet like any other Sai devotee.

.. .. We request you to kindly confirm receipt of this letter and acknowledge withdrawal of the request for rooms and office space made by us on 12th April, 2010.

**(ड)** थोडक्यात, शिर्डी साई ट्रस्ट, पट्टीपुलम, चेन्नईचे मा. कार्यकारी विश्वस्त श्री. के. व्ही. रमणी यांनी त्यांचेकडील दिनांक १२ एप्रिल, २०१० रोजीचे पत्राने केलेली विनंती विनाअट / विनाशर्त मागे घेत असलेबाबत कळविले आहे.

तरी शिर्डी साई ट्रस्ट,चेन्नई या संस्थेचे कार्यकारी विश्वस्त मा. श्री. के. व्ही. रमणी यांचे उपरोक्त विषयांकित पत्र स्विकारुन, त्यानुसार यापुर्वीचे मा. व्यवस्थापन समितीचे दि. १० आक्टोबर, २०१० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७९७ रद्दबातल करणेस व त्याबाबत मा. श्री. के. व्ही. रमणी आणि विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना कळविणेकामी मान्यता मिळणेसाठी मा. त्रिसदस्यीय समितीचे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र. ८६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी साई ट्रस्ट,चेन्नई या संस्थेचे कार्यकारी विश्वस्त मा. श्री. के. व्ही. रमणी यांचे उपरोक्त विषयांकित पत्र स्विकारुन, त्यानुसार यापुर्वीचे मा. व्यवस्थापन समितीचे दि. १० आक्टोबर, २०१० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७९७ रद्दबातल करणेस व त्याबाबत मा. श्री. के. व्ही. रमणी आणि विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना कळविणेकामी मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०९** **खरेदीखतामध्ये राखीव ठेवलेली रक्कम पुर्वाश्रमीचे खातेदारांना आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २८ ऑगष्ट, २०११ रोजीच्या सभेतील निर्णय क्रमांक ६२४ अन्वये खाली तक्त्यात नमूद केलेल्या खातेदारांची जमीन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीने खरेदी केलेली आहे :

**तक्ता क्रमांक ०१**

| अ.नं | खातेदाराचे नांव | खरेदीखत नोंदणी क्रमांक व दिनांक | गावाचे नांव / सर्व्हे नंबर | ७/१२ च्या उताऱ्यानुसार खरेदी केलेले क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| ०१ | सौ. किरण राजेश भनसाळी<br>श्री.सोमेश दत्तात्रय वाबळे | ६३९० /<br>२३ डिसेंबर, २०१२ | शिर्डी<br>२०७/२ | ०० हे ८० आर |

तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार व खरेदीखतातील अटी व शर्तीनुसार संबंधित खातेदारांची खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे रक्कम जमिनीची सरकारी मोजणी होऊन, ७/१२ चे नोंदीनुसार संपूर्ण क्षेत्र ताब्यात मिळेपर्यन्त राखून ठेवण्यांत आलेली आहे :

**तक्ता क्रमांक ०२**

| अ. नं. | खातेदाराचे नांव | गावाचे नांव/ सर्व्हे नंबर | ७/१२ च्या उताऱ्यानुसार खरेदी केलेले क्षेत्र | रु.३,५०,०००/- मात्र प्रति आर प्रमाणे जमिनीची खरेदी किंमत रुपये | खरेदीखतातील अटी शर्तीनुसार प्रत्यक्षात आदा करणेत आलेली ८० टक्के रक्कम रुपये | खरेदीखतातील अटी शर्तीनुसार संस्थानकडे राखून ठेवण्यात २० % आलेली रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| (१ | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| ०१ | सौ. किरण राजेश भनसाळी | शिर्डी २०७/२ | ०० हे ८० आर | २,८०,००,०००/- | १,३४,४०,०००/- | ३३,६०,०००/- |
| ०२ | श्री. सोमेश दत्तात्रय वाबळे | | | | ०,८९,६०,०००/- | २२,४०,०००/- |
| | एकुण | | | २,८०,००,०००/- | २,२४,००,०००/- | ५६,००,०००/- |

**(ब)** खरेदीखतातील अटी व शर्तीनुसार, सदरहू जमिनीची सरकारी पोटहिस्सा मोजणी करणेकामी मा. उपअधिक्षक, भूमि अभिलेख, राहाता यांचेकडेस मोजणी अर्ज जावक क्रमांक ६२५२ / दिनांक १२ मार्च, २०१२ नुसार अर्ज करणेत आलेला होता.

त्यानुसार मा. उपअधिक्षक, भूमि अभिलेख, राहाता यांचे कार्यालयाचे भूकरमापक, पूर्वाश्रमीचे जमीनमालक, लगतचे खातेदार व संस्थान प्रतिनिधी यांचे उपस्थितीत दिनांक १४ मे, २०१२ व दिनांक १८ ऑक्टोबर, २०१२ रोजी पूर्ण करण्यात आलेली आहे. भूमि अभिलेख विभागाने उपरोक्त जमिनीचा मोजणी नकाशा दिनांक २३ ऑक्टोबर, २०१२ रोजी इकडील कार्यालयास सादर केलेला आहे.

तसेच संस्थानचे कनिष्ठ अभियंता व मुकादम यांनी दिनांक २५ ऑक्टोबर, २०१२ रोजीचे मंजूर अहवालानुसार, खरेदीखतात नमूद केलेप्रमाणे व ७/१२ वर असलेल्या नोंदीप्रमाणे तसेच मोजणी नकाशातील रेखांकनाच्या मोजमापानुसार, पूर्वाश्रमीचे जमीनमालक सौ. किरण राजेश भनसाळी व श्री. सोमेश दत्तात्रय वाबळे यांचेकडून संस्थानने खरेदी घेतलेल्या मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर २०७/२ चे क्षेत्र ०० हे ८० आर बरोबर भरत आहे. सध्या जमिनीचा ताबा संस्थानकडे असून, सदर जमिनीचे क्षेत्रामध्ये आवश्यक त्या ठिकाणी सिमेंटचे खांब निशाणीसाठी रोवणेत आलेले आहेत, असा अहवाल दिलेला आहे.

तसेच पूर्वाश्रमीचे जमीनमालक सौ. भनसाळी व श्री. वाबळे यांनी दिनांक २६ ऑक्टोबर, २०१२ रोजी, मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर २०७/२ मधील क्षेत्र ८० आर ताब्यात दिले असून, खरेदीपोटी राखून ठेवलेली २० टक्के रक्कम मिळावी म्हणून विनंती अर्ज दिला आहे.

**(क)** उपरोक्त परिच्छेद अ व ब मध्ये नमूद केलेप्रमाणे तसेच दिनांक २३ डिसेंबर, २०११ रोजी करणेत आलेल्या नोंदणीकृत खरेदीखतातील नोंदीनुसार, मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर २०७/२ मधील क्षेत्र ०० हेक्टर ८० आर संस्थानच्या ताब्यात मिळालेले आहे. त्यामुळे नोंदणीकृत खरेदीखतातील अटी-शर्तीनुसार राखून ठेवण्यात आलेली २० टक्के रक्कम ( तक्ता क्रमांक ०२ मधील रकाना क्रमांक ०७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ) व सध्या संस्थानचे लेखाशाखेकडे संबंधित खातेदारांचे नांवे Outstanding Liabilities खाती जमा असलेली रक्कम संबंधीत खातेदारांना धनादेशाव्दारे आदा करणे आवश्यक आहे.

| अ.नं. | पूर्वाश्रमी जमीनमालकाचे / खातेदाराचे नांव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१ | सौ. किरण राजेश भनसाळी<br>(Mrs. Kiran Rajesh Bhansali ) | ३३,६०,०००/- |
| ०२ | श्री. सोमेश दत्तात्रय वाबळे<br>(Shri. Somesh Dattatraya Wable ) | २२,४०,०००/- |
| | एकूण रुपये | ५६,००,०००/- |

**(ड)** तरी उपरोक्त परिच्छेद ड मध्ये नमुद केलेप्रमाणे, मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर २०७/२ क्षेत्र ८० आरचे पूर्वाश्रमीचे जमीनमालक / खातेदार सौ. किरण राजेश भनसाळी व श्री. सोमेश दत्तात्रय वाबळे यांना त्यांचे जमिनीचे खरेदीपोटी संस्थानने राखून ठेवलेली २० टक्के रक्कम, खरेदीखतातील अटी - शर्तीची पूर्तता झाल्याने आदा करणेस मान्यता मिळणेकामी मा. त्रिसदस्यीय समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८६६ यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर २०७/२ क्षेत्र ८० आरचे पूर्वाश्रमीचे जमीनमालक / खातेदार सौ. किरण राजेश भनसाळी व श्री. सोमेश दत्तात्रय वाबळे यांना त्यांचे जमिनीचे खरेदीपोटी संस्थानने राखून ठेवलेली २० टक्के रक्कम, खरेदीखतातील अटी - शर्तीची पूर्तता झाल्याने आदा करणेकामी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठापुढे संस्थानचे वकीलामार्फत अर्ज सादर करावा व त्यांचे मान्यतेनंतर रक्कम अदा करण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१० मुख्य हेलीपॅड व साई आश्रम भाग-०१ येथील आर्थिंगचे कामास व खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** महामहिम राष्ट्रपती महोदय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे शुभहस्ते "साईआश्रम " या प्रकल्पाचे दि. १६-११-२०१२ रोजी उदघाटन होत आहे. त्या अनुषंगाने दि.०३-११-२०१२ रोजी मा. विद्युत निरीक्षक, अहमदनगर यांनी संस्थानचे मुख्य हेलीपॅड, साई आश्रम भाग-०१ तसेच श्री समाधी मंदिराकडे भेट देवून स्थळांचे निरिक्षण करण्यात आले. या निरिक्षणामध्ये मा. विद्युत निरीक्षक, अहमदनगर यांनी हेलिपॅडवरील वेटींग रुम, कंपाऊंड, पाण्याचा पंप, स्ट्रीट लाईट, ५/१५A सॉकेट, चेंजओव्हर स्विच, मिटर बॉक्स, बाथरुममधील पॉवर पॉईट, छताचे लोखंडी टिन स्ट्रक्चर व जनरेटरकरिता अर्थिंग देण्यास कळविलेले आहे. तसेच साई आश्रम भाग-०१ "ए" ब्लॉककरिता तसेच "एच" ब्लॉकसमोर असलेल्या डायसच्या (स्टेज) पाठीमागील रुम्सला अर्थिंग देण्यास कळविले आहे.

मा. विद्युत निरीक्षक, अहमदनगर यांनी कळविले प्रमाणे मुख्य हेलीपॅड येथे एकुण ०६ अर्थिंग तसेच साईआश्रम भाग -०१ येथे एकुण ०५ अर्थिंग अशा एकुण ११ अर्थिंगपीट कराव्या लागणार आहे. सदरचे काम बाहेरील ठेकेदाराकडून करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रु.७८,३२८/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ८६७ यावर सविस्तर चर्चा होऊन, मुख्य हेलीपॅड व साई आश्रम भाग-०१ येथील आर्थिंगचे कामास व या कामासाठी येणाऱ्या रक्कम रु.७८,३२८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.११ सोलर स्टीम कुकिंग प्रकल्प बंद करणे बाबतचा प्रभारी संचालक, बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा आदेश.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयातील जुलै-२००९ पासून दैनंदिन इंधन खर्चात कपात होणेकरिता सर्वात मोठा सोलर स्टिम कुकिंग प्रकल्प कार्यान्वित करण्यात आलेला आहे. प्रकल्प उभारणीकामी संस्थानला १ कोटी ३७ लाख ८३ हजार खर्च आलेला आहे. त्यापैकी संस्थानला प्रस्तुत प्रकल्पासाठी रक्कम रु.५८ लाख ४० हजार केंद्र सरकारचे अपारंपारीक उर्जा मंत्रालयाव्दारे अनुदान मिळालेले आहे.

**प्रकल्पाचे सल्लागार-**

१.मेडा (महाराष्ट्र शासन)

२.मा.कुलगुरु डॉ.एम.जी. ताकवले यांचे मार्गदर्शनाने प्रकल्पाची उभारणी मे.गढीया सोलर एनर्जी सिस्टीम्स, बलसाड (गुजरात) यांनी केलेली आहे. तसेच जुन २०१४ प्रर्यंत दुरुस्ती-देखभाल व ऑपरेटिंग मे.गढीया सोलर एनर्जी सिस्टीम्स प्रा.लि., बलसाड (गुजरात) यांनीच करावयाचे आहे.

प्रकल्पाव्दारे जुलै -२०१२ अखेर ७,७२,७२७ किलो वाफेची निर्मीती करण्यात आलेली आहे. त्याव्दारे ४,२०,२६५ किलो अन्न शिजविण्यात आलेले असुन त्यामुळे रक्कम रु.२६,१६,६१५ रुपयाची बचत झालेली आहे.

दि.१९/१/२०११ रोजी डेप्यु.डायरेक्टर ऑफ स्टीम बॉयलर महाराष्ट्र शासन,अ.नगर यांनी संस्थानला सोलर प्रकल्पाची IBR कायदयानुसार तपासणी करणे बाबतचे पत्र दिलेले आहे, त्याबाबत प्रकल्प सल्लागार मेडा व डॉ.एम.जी.ताकवले यांचा सल्ला घेवुन पुढील कार्यवाही सुरु आहे.

डेप्य.डायरेक्टर ऑफ स्टीम बॉयलर, महाराष्ट्र शासन, अ.नगर यांचे दि.१९/१/२०११ चे पत्रानुसार प्रकल्पाची IBR तपासणी करणेकामी दि. ८ जुन २०११ रोजी शासकीय कोषागारात स्टेट बॅक शाखा,राहाता येथे चलणाव्दारे रक्कम रु ६०० फी भरलेली आहे. त्यानंतर जाईन्ट डायरेक्टर, अहमदनगर यांना पत्र देवून मार्गदर्शन होणेबाबत विनंती पत्र दिलेले आहे. त्यांचे सुचनेनूसार प्रकल्प ठेकेदार यांना IBR बाबतची कार्यपूर्ती करणेबाबत पत्र तसेच कायदेशिर नोटीस दिलेली आहे.

सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाची IBR तपासणी हा संपुर्ण राज्य तसेच देशाचा धोरणात्मक निर्णय असल्याने मेडा कार्यालय, पुणे केंद्रीय अपारंपारीक ऊर्जा मंत्रालय, नवी दिल्ली यांना पत्र देवून निर्णय होणेबाबत कळविले आहे. अपारंपारीक ऊर्जा मंत्रालयाचे डायरेक्टर री अे.के.सिंघल यांनी केंद्रीय वाणिज्य व श्रम मंत्रालयाचे तांत्रिक सल्लागार यांना प्रस्तुत प्रकल्पास IBR कायद्यातून सवलत मिळणेबाबत दिनांक २५/०९/२०१२ रोजी फॅक्स पत्र दिलेले आहे. त्यानंतर प्रस्तुत विषयावर मार्गदर्शन व निर्णय होणेकामी दिनांक २७/०९/२०१२ रोजी साईनिवास मिटींग हॉल येथे मा.कार्यकारी अधिकारी साहेब, डॉ.एम.जी. ताकवले (प्रकल्प सल्लागार) , श्री मानकर, डेप्युटी डायरेक्टर ऑफ स्टीम बॉयलर, महाराष्ट्र शासन, अहमदनगर , श्री अभिजीत हिंगे, प्रोजेक्ट मॅनेजर, मेडा, तसेच श्री.बी.डी साबळे, प्रशासकीय अधिकारी व इकडील सहाय्यक अभियंता व अधिक्षक उपस्थित होते.

दिनांक २७/०९/२०१२ रोजीचे मिटींगमधील चर्चेनूसार बॉयलर इन्स्पेक्टर यांनी दिनांक १७/०९/२०१२ रोजी घेतलेल्या मोजमापानूसार एकूण १९ हेडर पैकी ११ हेडर ५०० लि.पेक्षा जास्त आकारमान असलेले त्यांचे ५०० लि. पेक्षा कमी आकारमान करणे गरजेचे आहे. फ्लेरीयम उर्फ गढीया सोलर यांनी बॉयलर इन्स्पेक्टर यांचे पत्र आल्यानंतर पत्रात नमूद केलेप्रमाणे प्रकल्पाच्या डिझाईनमध्ये तातडीने बदल करण्याचे मान्य केलेले आहे.

तथापी डेप्यु.डायरेक्टर ऑफ स्टीम बॉयलर, अहमदनगर यांचेकडून तपासणीनंतर कुठल्याही स्वरुपाचे अद्याप पत्र आलेले नाही. मात्र संदर्भिय प्रभारी संचालक, बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी प्रकल्प चालविण्याचे प्रमाणपत्र अथवा त्यांनी दिलेले नाहरकत प्रमाणपत्र नसल्याने प्रकल्प बंद करणेबाबतचा आदेश दिलेला आहे.

**<u>वास्तविक-</u>**

१. डेप्यु.डायरेक्टर ऑफ स्टीम बॉयलर ,महाराष्ट्र शासन, अहमदनगर यांनी दि.०१/०१/२०११ रोजी प्रकल्पास पुर्वकल्पना न देता भेट देवून दिनांक १९/०१/२०११ रोजी संस्थानला सोलर प्रकल्पाची IBR तपासणीकामी पत्र दिलेले आहे.

२. त्यानूसार संस्थानने प्रकल्प सल्लागार यांचे मार्गदर्शन घेवून प्रकल्पाची IBR नूसार तपासणी करणेकामी शासकीय फी दि.०८ जून २०११ रोजी भरलेली आहे.

३. फी भरलेनंतर बॉयलर इन्सपेक्टर कार्यालय, अहमदनगर यांना सोलर प्रकल्पाची IBR नूसार तपासणी करणे कळविलेले आहे.

४. मात्र बॉयलर इन्सपेक्टर यांचेकडून उशिराने दि.१७/०९/२०१२ रोजी तपासणी करण्यात आलेली आहे., तपासणीनंतर त्यांनी संस्थानने आयोजीत दि.२७/०९/२०१२ रोजीचे मिटींगमध्ये प्रकल्पाचे तपासणीबाबत सिस्टीमचे ११ हेडर ५०० लि.पेक्षा जास्त क्षमतेचे असून त्यांची क्षमता ५०० लि. पेक्षा कमी करावी लागेल. त्यानंतर पुन्हा तपासणी होवून त्याबाबतचे पत्र देता येईल असे सांगितले. मात्र लिखित स्वरुपात अद्याप त्यांचेकडून कुठलेही पत्र आलेले नाही.

५. असे असतांना प्रभारी संचालय, बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी प्रकल्पास प्रमाणपत्र नसल्याने प्रकल्प त्वरीत बंद ठेवणेबाबतचा आदेश दिलेला आहे. त्याबाबत प्रकल्प सल्लागार मेडा, डॉ.ताकवले तसेच केंद्रीय अपारंपारीक ऊर्जा मंत्रालयाचे डायरेक्टर डॉ.अे.के. सिंघल यांना प्रस्तुत पत्राची ई-मेल व्दारे प्रत पाठवून पुढील कार्यवाहीबाबत मार्गदर्शन घेता येईल.

त्यानूसार सोलर प्रकल्पाचे IBR तपासणीकामी अपारंपारीक ऊर्जा मंत्रालय,भारत सरकार, कामगार व वाणिज्य तथा औद्योगिक मंत्रालय, भारत सरकार, प्रभारी संचालक, बाष्पके, महाराष्ट्र शासन, मुंबई, डेप्युटी डायरेक्टर, स्टीम बॉयलर,अहमदनगर यांचे सोबत आवश्यक ती कार्यालयीन कार्यवाही करणेकामी.

अ) प्रकल्प सल्लागार १) मेडा २ ) डॉ.एम.जी. ताकवले मा.कुलगुरु यांचे मार्गदर्शन घेणेबाबत.

ब) प्रकल्प पुरवठादार मे.गढीया सोलर एनर्जी सिस्टीम्स सध्या बदललेले नांव फ्लेरीयम टेक्नॉलॉजीस,मुंबई हे प्रकल्पाची IBR तपासणी करणेस असमर्थ ठरल्यास दुसरी एजन्सी नेमून IBR तपासणीबाबतची कार्यपुर्ती करणेसाठी होणाऱ्या खर्चाची रक्कम मे.गढीया सोलर एनर्जी सिस्टीम्स उर्फ फ्लेरीयम टेक्नॉलॉजीस,मुंबई यांचेकडून वसूल करणेस तसेच प्रकल्पाचा खराब परफारमन्स दिलेमुळे त्यांची संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम रु.१३,३०,०००/- जप्त करणेबाबत.

क) प्रकल्प IBR तपासणीकामी अंदाजे सहा महिने कालावधी करीता बंद रहाणार असलेने प्रतिदीन २६० किलो एल.पी गॅसचा इंधन खर्च वाढणार आहे. त्यामुळे प्रचलित दरानूसार सहा महिन्याकरीता संस्थानला रु.३७,०५,१५६/- एवढा वाढीव खर्च येणार आहे. प्रस्तुत खर्चाची रक्कम प्रकल्प पुरवठादार यांचेकडून वसूल करणेकामी कायदेशीर कारवाई करणेबाबत.

ड) सोलर स्टीम कुकींग प्रकल्प IBR तपासणीकामी अंदाजे सहा महिने बंद रहाणार असल्याने श्री साई प्रसादालयाचे प्रसादभोजन, लाडू बुंदी व अन्नपाकीटे बनविणेकामी अंदाजे रक्कम रुपये ३७,०५,१५६/- चे वाढीव इंधन खर्चास मान्यता मिळणेबाबत.

उपरोक्तप्रमाणे अ), ब), क) ड) नूसार कार्यवाही होणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन (त्रिसदस्सीय) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र. ८६८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, साईप्रसादालय )

---

**विषय नं.१२ इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. यांची बल्क एल.पी. गॅस खरेदीवरील आर्थिक सवलत बंद होत असलेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईप्रसादालयात प्रसाद भोजन बनविणेकामी इंधन म्हणून एल.पी. गॅसचा वापर करण्यात येतो. सदरचा एल.पी. गॅस इंडीयन ऑईल कॉर्पो. लि. मनमाड येथून खरेदी करण्यात येत असून प्रसादालय विभागास दर महीन्याकरीता सरासरी ५० मे. टन गॅस खरेदी करण्यात येतो. त्याकामी संस्थानने इंडीयन आईल कॉ. लि. यांना रु. १४ लाख रक्कम ॲडव्हान्स म्हणून देण्यात आलेली आहे. इंडीयन ऑईल कॉ. लि. यांचेकडून प्रत्येक मे. टनाकरीता रक्कम रु. ४४००/- सुट देणेत येत आहे.

तथापि इंडीयन ऑईल कॉ. लि. पुणे यांचे दिनांक २७.९.२०१२ रोजीचे पत्राने दिनांक १.११.२०१२ रोजी पासून संस्थानला देण्यात येत असलेली सुट बंद करत असलेबाबत कळविण्यात आलेले आहे. सुट बंद होत असल्याने संस्थानला प्रत्येक मे. टनाकरीता रु. ४४००/- जादा खर्च येणार आहे. प्रत्येक महिण्यासाठी अंदाजे रक्कम रु.२,२०,०००/- तर एक वर्षा साठी अंदाजे रक्कम रु. २६,४०,०००/- जादा खर्च येणार आहे. इंडीयन ऑईल कॉ. लि. पुणे यांचे मार्केटींग मॅनेजर श्रीमती उल्का राजाध्यक्ष मॅडम यांचेशी दुरध्वनीवर चर्चा केली असता त्यांनी सेंट्रल गर्व्हमेंटच्या नविन धोरणामुळे आम्हाला सवलत देता येणार नाही असे सांगितलेले आहे. त्यामुळे आपणास १ महीना आगाऊ नोटीस देऊन आपले सोबत केलेला करारनामा रद्द करत असलेबाबत सांगितले आहे. अन्य गॅस पुरवठा करणारी कंपनी भारत पेट्रोलियम यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी सुद्धा केंद्र शासनाच्या गॅस विषयक बदललेल्या धोरणामुळे गॅस डिस्काऊंट देणेस असमर्थता दर्शविली आहे.

दिनांक २.११.२०११ रोजी इंडीयन ऑईल कॉ. लि. यांचे सोबत केलेल्या करारनाम्यातील अटी शर्ती क्रं ५.२ नुसार इंडीयन ऑईल कॉ. लि. यांनी संस्थानला दिनांक ३१.१०.२०१६ पर्यंत प्रती मे. टनाकरीता रु. ४४००/- सवलत देणार असल्याचे नमूद केलेले आहेत. तथापि इंडीयन ऑईल कॉ. लि. पुणे यांचे पत्रानुसार करानाम्यातील अटी शती क्रं. ५.२ चे उल्लघंन होत असल्याने त्याबाबत विधी विभागामार्फत संस्थान हिताचे दृष्टीने उचित कार्यवाही करण्यात येत आहे. श्री साईप्रसादालयासाठी इंधन म्हणून एल. पी. गॅस हि अत्यावश्यक बाब असल्याने इंडीयन ऑईल कॉ .लि. यांचे दिनांक २७.९.२०१२ चे पत्रानुसार दिनांक १.११.२०१२ पासून विना सवलत प्रचलित दराने IOCL, BPCL, HPCL या पेट्रोलियम कंपन्याकडून गॅस खरेदी करावा लागणार आहे.

तरी दिनांक १.११.२०१२ पासून इंडीयन ऑईल कॉ. लि. यांचेकडून अथवा अन्य भारत पेट्रोलियम, हिदुस्थान पेट्रोलियम यांचेकडून विनासवलत केंद्रशासनाच्या धोरणानुसार वेळोवेळी होणाऱ्या प्रचलित दराने गॅस खरेदी करणेस व त्याकामी अंदाजे रक्कम रु २६,४०,०००/- प्रती वर्ष होणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता मिळणेस मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र. ८६९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.१३ साईनिवास अतिथीगृह मिटींग हॉलमध्ये प्रेझेंटेशनसाठी रिमोटवर ऑपरेट होणारी स्क्रीन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानच्या अतिथीगृह व साईनिवास या दोन्ही सभागृहात मान्यवरांना प्रेझेंटेशन दाखविणे कामी २ नग एल.सी.डी.प्रोजेक्टर खरेदी केलेले आहेत. तेथे सध्या साधे फ्लेक्स बोर्ड बसविलेले आहेत.त्या ऐवजी खालीलप्रमाणे रिमोटवर ऑपरेट होणारी स्क्रिन बसविणेचे नियोजन आहे.त्या खरेदीकरीता खालील प्रमाणे खर्च येणार आहे.

| अ.नं | मटेरियलचे वर्णन | कंपनी | अंदाजे किंमत | नग | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | रिमोट कंट्रोलवर ऑपरेट होणारी स्क्रिन (पडदा)८x१०फुट | CROSS ( क्रॉस ) | ३५,०००/- | ०२ | ७०,०००/- |
| | | | **एकुण रुपये-** | | **७०,०००/-** |

उपरोक्त स्क्रिन खरेदीकामी अंदाजे रुपये ७०,०००/- खर्च येण्याची शक्यता आहे.तरी कृपया सदरील रिमोट कंट्रोल स्क्रिन खरेदी विभागामार्फत कोटेशन मागवून खरेदीस व खरेदीकामी येणाऱ्या ७०,०००/- (अक्षरी रुपये :- सत्तर हजार रुपये मात्र) च्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ८७० यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनिवास अतिथीगृह मिटींग हॉलमध्ये प्रेझेंटेशनसाठी रिमोटवर ऑपरेट होणारी स्क्रीन विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.७०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- ध्वनीक्षेपण विभागप्रमुख)

---

**विषय नं.१४ श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१२ चे प्रत्यक्ष झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१२ मधील खर्चाकरीता मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.९/०५/२०१२ चे सभेतील निर्णय क्र.३९६ अन्वये एकुण रुपये ४५,१८,४०१/- चे अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे. प्रत्यक्षात खालीलप्रमाणे खर्च झालेला आहे.

| अ. नं | तपशील | अंदाजपत्रकातील मंजुर रक्कम | प्रत्यक्ष खर्च | तरतुदीपेक्षा जादा खर्च | तरतुदी पेक्षा कमी खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | मंडप कमानी स्टेज | १८,००,०००/- | १३,९७,६०१/- | ०० | ४,०२,३९९/- |
| २ | कलाकार बिदागी कीर्तनकारासह | २,००,०००/- | १४,५४१/- | ०० | १,८५,४५९/- |
| ३ | मिष्टान्न खर्च -मजूरीसह | ५,९८,४०१/- | ५,०१,३७६/- | ०० | ९७,०२५/- |
| ४ | विद्युत रोषणाई ,जनसेट भाडे , इंधन खर्च इ. | १,२५,०००/- | ४३,५६६/- | ०० | ८१,४३४/- |
| ५ | निमंत्रण पत्रिका, जाहिरात, पोष्टेज, उदी- प्रसादासह | १३,००,०००/- | ११,१३,०७६/- | ०० | १,८६,९२४/- |
| ६ | जादा कंत्राटी कर्मचारी स्वयंसेवक (विद्यार्थी) मानधन | २,००,०००/- | १,८१,०३८/- | ०० | १८९६२/- |
| ७ | इतर खर्च- प्रसाद,प्रसादालय फर्निचरभाडे, गेस्ट हाऊस, व्ही.डी.ओ. शुटींग, फोटोग्राफी, पेंटर बीले इत्यादी | १,००,०००/- | ३४,२०८/- | ०० | ६५७९२/- |
| ८ | पालख्यांचे पिण्याचे पाण्याची व्यवस्था खर्च व पिण्याचे पाण्याची व्यवस्था | १,७५,०००/- | २४,९८७/- | ०० | १,५०,०१३/- |
| ९ | भक्तांसाठी रांगेत वाटण्यात येणा-या पिण्याचे पाण्याचे पाऊचचा खर्च. | १०,०००/- | ०० | ०० | १००००/- |
| १० | मंदिर व मंदिर परीसर फुलांचे डेकोरेशन | १०,०००/- | ०० | ०० | १००००/- |
| ११ | प्रथमोपचार केंद्राकरीता तातडीचे औषध खरेदी | ०० | ०० | ०० | ०० |
| | | **४५,१८,४०१/** | **३३,१०,३९३/-** | ०० | **१२,०८,००८/** |

उपरोक्त तपशील पाहता श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१२ करीता एकुण रुपये ४५,१८,४०१/- ( अक्षरी रुपये पंचेचाळीस लाख आठरा हजार चारशे एक मात्र ) अंदाजपत्रक तरतुद करण्यात आलेली होती. या उत्सवाकरीता प्रत्यक्षात एकुण रुपये ३३,१०,३९३/- ( अक्षरी रुपये तेहतीस लाख दहा हजार तिनशे त्र्यांन्नव मात्र ) खर्च झालेला आहे. तरी सदरचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ८७१ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१२ करीता प्रत्यक्षात झालेल्या रक्कम रुपये ३३,१०,३९३/- मात्र खर्चाची नोंद घेण्यात आली** (कार्यवाही-प्रशासन शाखा- वशी-०५)

---

**विषय नं.१५** **लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी आस्थापनेच्या विविध विभागांना कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कंत्राटी कामगार दि.०१-०४-२०११ पासून ते दि.३१-०३-२०१३ अखेर या कालावधीत पुरविणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७-०२-२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१३७ (अ) नुसार मे.बी.व्ही.जी. इंडिया लि.,पुणे यांची लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे. तसेच संस्थानचे संरक्षण विभागास कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी दि.०१-०५-२०११ पासून ते दि.३०-०४-२०१३ अखेर या कालावधीत पुरविणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६-०३-२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२११ नुसार मे.मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स (इंडिया) प्रा.लि.,पुणे , मे.ईगल आय एन्टरप्राईज, दमन (यु.टी.), मे. सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,मुंबई, मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टम्स प्रा.लि.,पुणे व मे.जी.के.सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,मुंबई यांची सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे.

त्याप्रमाणे लेबर कॉन्ट्रॅक्टर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत संस्थानला पुरविणेत येणाऱ्या कंत्राटी अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी यांची हजेरी पत्रकाप्रमाणे सध्याची पटसंख्या अनुक्रमे १५५५ व ६०३ अशी एकुण-२१५८ इतकी आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७-०२-२०११ व दि.२६-०३-२०११ रोजीचे सभेमध्ये उपस्थित संबंधीत लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे प्रतिनिधींशी निविदा संदर्भात चर्चा/वाटाघाटी होऊन, अनुक्रमे निर्णय क्र.१३७ (अ) व निर्णय क्र.२११ नुसार "माहे ऑक्टोबर ते सप्टेंबर या एक वर्ष कालावधीत याप्रमाणे कंत्राटी कामगारांना तसेच कंत्राटी सुरक्षा कर्मचारी/माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी यांना मिळणाऱ्या वेतनाचे रक्कमेवर ८.३३% याप्रमाणे सानुग्रह अनुदान रक्कम कंत्राटी कामगारांना दिपावली सणाचे अगोदर आदा करणेकामी कंत्राटदारास देणेत यावी." असा निर्णय पारीत झालेला आहे. त्यास अनुसरून संस्थानमध्ये मागील वर्षी लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्समार्फत दि.०१-१०-२०१० ते दि.३०-०९-२०११ या कालावधीत व त्यापुढेही सलग कंत्राटी पध्दतीने कामास असलेल्या सर्व अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी/माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी यांना आदा केलेल्या एकुण वेतनाचे ८.३३% इतकी रक्कम संबंधीत लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान म्हणून देणेत आलेली आहे.

सबब, संस्थानमध्ये लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत कंत्राटी पध्दतीने कामास असलेल्या व सध्याही काम करीत असलेल्या कंत्राटी अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी/माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी यांना सालाबाद प्रमाणे यावर्षीही दि.०१-१०-२०११ पासून ते दि.३०-०९-२०१२ या कालावधीमध्ये मिळालेल्या एकुण वेतनाचे ८.३३% इतकी रक्कम दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान म्हणुन दयावयाची झ ाल्यास त्याकामी अंदाजे रक्कम रूपये १, ०४, ६६, ०१३=०० (अक्षरी रूपये एक कोटी चार लाख सहासष्ट हजार तेरा) मात्र इतका खर्च येईल.

तरी संस्थानला कंत्राटदारामार्फत पुरविणेत येणाऱ्या व सध्या काम करीत असलेल्या कंत्राटी अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी/माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी यांना सालाबादप्रमाणे यावर्षीही दिपावलीपूर्वी दि.०१-१०-२०११ ते दि.३०-०९-२०१२ या कालावधीमध्ये मिळालेल्या एकुण वेतनाचे ८.३३% इतकी रक्कम (अंदाजे रक्कम रूपये-१,०४,६६,०१३/-) दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान म्हणून कंत्राटदारामार्फत आदा करणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ८७२ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला कंत्राटदारामार्फत पुरविणेत येणाऱ्या व सध्या काम करीत असलेल्या कंत्राटी अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी/माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी यांना सालाबादप्रमाणे यावर्षीही दिपावलीपूर्वी दि.०१-१०-२०११ ते दि.३०-०९-२०१२ या कालावधीमध्ये मिळालेल्या एकुण वेतनाचे ८.३३% इतकी रक्कम दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान म्हणून कंत्राटदारामार्फत आदा करणेस तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१,०४,६६,०१३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१६** **संस्थान सेवकांना सानुग्रह अनुदान देणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन १९७७ पासून सन-२०११ पावेतो ३५ वर्षापासून संस्थान कर्मचा-यांना दिवाळी सणांनिमित्त प्रत्येक वर्षी दिवाळी पूर्वी सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे. सन १९८४ पुर्वी संस्थानचा कारभार कोर्ट रिसीव्हर यांचेकडे होता. त्यावेळी संस्थानचे व्यवस्थापन मा.सिटी सिव्हील कोर्ट, मुंबई यांचे नियंत्रणाखाली असे.

मा. सिस्टी सिव्हील कोर्टाने संस्थानसाठी व्यवस्थापन स्कीम तयार करुन व्यवस्थापन समिती सदस्यांची नेमणूक केली. त्यानुसार श्री साईबाबा संस्थान ट्रस्टचा कारभार धर्मादाय आयुक्त यांचे नियंत्रणाखाली चालत असे.

त्यानंतर सन-२००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ अस्तित्वात आलेनंतर श्री साईबाबा संस्थानचे व्यवस्थापन महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाचे नियंत्रणाखाली आहे. सदर अधिनियमातील कलम १६ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

"नियत दिवसाच्या लगतपूर्वी जी व्यक्ती पूर्वीच्या विश्वस्त व्यवस्थेच्या सेवेत असेल आणि त्याच्या कामकाजासंबंधात काम करीत असेल अशी कोणतीही व्यक्ती ही, नियत दिवसाच्या लगतपूर्वी तिला जे वेतन लागू होते त्याच वेतनावर व सेवेच्या त्याच इतर अटी व शर्तीवर नियत दिवसापासून समितीच्या नियंत्रणाखाली संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कामकाजाशी संबंधीत अशा सेवेसाठी नेमून देण्यात आल्याचे व नियुक्त केल्याचे मानण्यात येईल आणि सेवेच्या अशा शर्तीमध्ये राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेखेरीज त्या व्यक्तीचे अहित होईल अशा रीतीने समितीकडून कोणताही बदल करण्यात येणार नाही किंवा अशा व्यक्तीला सेवेतून काढून टाकण्यात येणार नाही. परंतू या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या किंवा नियमांच्या तरतूदीनुसार अशा कोणत्याही व्यक्तीची सेवा समाप्त करण्याच्या समितीच्या अधिकारावर या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे परिणाम होणार नाही."

सदर कायद्यातील उक्त तरतुदीनुसार प्रत्येक वर्षीचा सानुग्रह अनुदानाचा खर्च याच कायद्याच्या अंतर्गत कलम २२ नुसार व्यवस्थापन निधीत दर्शविण्यात येतो व व्यवस्थापन निधीतून केलेल्या खर्चाच्या नोंदी वार्षीक अहवालातून राज्य शासनाच्या व विधी मंडळाच्या पटलासमोर प्रत्येक वर्षी मान्यतेसाठी सादर करण्यात येतात.

उपरोक्त प्रमाणे वेळोवेळी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने सन १९८४ ते २०११ पर्यंत स्थायी कर्मचा-यांना व सन-२०११ पासून स्थायी व अस्थायी कंत्राटी कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४/०९/२०११ रोजीचे सभेतील निर्णयानुसार रक्कम रु. ४,२१,७७,६१३/- खालील प्रमाणे सानुग्रह अनुदान म्हणून देण्यात आलेली आहे.

०१) दि.०१/१०/२०१० ते ३०/०९/२०११ या कालावधीतील संस्थान आस्थापनेवर मासिक वेतन/ नियतवेतन/ मानधनावर सेवेत असलेले वर्ग-०४ चे कर्मचारी, अधिकारी. संस्थान आस्थापनेवरील मासिक एकत्रित मानधनावर, कंत्राटी पध्दतीने नेमणूका देण्यात आलेले विशेष कार्य अधिकारी,कनिष्ठ अभियंते, सल्लागार, मोजणीदार, वाहनचालक, ग्रंथालय सहाय्यक, कार्यालय प्रमुख, कार्यालय सहाय्यक मदतनीस. संस्थान आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने असलेले शासकिय अधिकारी यांना सानुग्रह अनुदान देण्यात आले.

०२) दि.०१/१०/२००१० ते ३०/०९/२०११ या कालावधीत ज्या कर्मचा-यावर गैरवर्तनाचा ठपका ठेवून अथवा ज्या कर्मचा-यावर शिस्तभंगाची कारवाई करुन सेवेतून कमी केलेले आहे अशा कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देण्यात आले नाही.

०३) संस्थानला कंत्राटी पध्दतीने कामगार पुरविणेसाठी नेमलेल्या लेबर व सुरक्षा कंत्राटदारामार्फत दि.०१/१०/२०१० ते दि.३०/०९/२०११ या कालावधीत कामास असलेल्या सर्व कंत्राटी कुशल, अकुशल तसेच माजी सैनिक सुरक्षा रक्षकासह इतर सुरक्षा कर्मचारी यांना दिलेल्या एकूण वेतनाचे ८.३३ टक्के एवढी रक्कम कंत्राटदार यांचे मार्फत सानुग्रह अनुदान देण्यात आले.

या वर्षीही संस्थान रुढीनुसार उपरोक्त संस्थान नियमाप्रमाणे पात्र ठरणा-या कर्मचा-यांना दि.०१/१०/२०११ ते ३०/०९/२०१२ अखेरच्या वार्षीक वेतनाच्या ८.३३ टक्के दराने (एका महिन्याचे वेतन) दिपावली पूर्वी सानुग्रह अनुदान देणेस मान्यता असावी. याकामी अंदाजे रक्कम रु. ४,८४,००,०००/- (अक्षरी रुपये चार कोटी चौ-याऐंशी लाख मात्र ) खर्च अपेक्षीत आहे.

**निर्णय क्र. ८७३ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केल्यानुसार संस्थान नियमाप्रमाणे व संस्थानचे प्रचलीत पध्दतीनुसार पात्र ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांना दि.०१/१०/२०११ ते ३०/०९/२०१२ अखेरच्या वार्षीक वेतनाच्या ८.३३ टक्के दराने (एका महिन्याचे वेतन) दिपावलीपूर्वी सानुग्रह अनुदान म्हणुन देणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. ४,८४,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना)

---

**विषय नं.१७ मा.महामहीम श्री.प्रणव मुखर्जी, राष्ट्रपती, भारत गणराज्य यांचे शिर्डी येथील दौऱ्याचे कालावधीत संस्थानने करावयाच्या नियोजनाबाबत पोलीस निरीक्षक, शिर्डी पोलिस स्टेशन यांचेकडून आलेल्या पत्रांनुसार कार्यवाही करणेबाबत.**

**प्रस्ताव-** साई आश्रम या भक्तनिवास प्रकल्पाचा उद्घाटन समारंभ मा.महामहीम श्री.प्रणव मुखर्जी, राष्ट्रपती, भारत गणराज्य यांचे शुभहस्ते शुक्रवार दि.१६/११/२०१२ रोजी संपन्न होणार आहे. मा.राष्ट्रपती महोदय यांचे शिर्डी दौऱ्याचे दरम्यान खाली नमुद केल्याप्रमाणे व्यवस्था ठेऊन नियोजन करावे यासाठी पोलीस निरीक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन यांचेकडून लेखी पत्राने कळविण्यात आलेले आहे.

| अ.नं. | पत्राचा दिनांक | कार्यवाहीची मागणी | संस्थानकडे उपलब्ध असलेल्या सोयी | अपेक्षित खर्च (रुपये) |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०२/११/२०१२ | मा.महनीय व्यक्ती यांचे | २० पोलीस अधिकाऱ्यांसाठी ५ | रु.१३,२००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | सुरक्षिततेच्या दृष्टीने बंदोबस्ताकरिता येणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची दि.१२/११/२०१२ ते १६/११/२०१२ पावेतो चहा, नाष्टा व जेवणाची व्यवस्था संस्थान मार्फत नि:शुल्क करावी. | दिवसांसाठी खालीलप्रमाणे अपेक्षीत खर्च<br>चहा - २० x रु.१ x २ वेळा x ५ दिवस = रु.२००/-<br>नाष्टा - (बाहेरुन) २०x५x५०=रु.५०००/-<br>जेवन - ४०x२०x२x५= रु.८०००/- | |
| ०२ | ०२/११/२०१२ | मा.महनीय व्यक्ती यांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने शिर्डी येथे येणाऱ्या आय.पी.एस. अधिकारी व उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे निवासाकरिता अतिथी निवास येथील १० रुम दि.१२/११/२०१२ ते १६/११/२०१२ पावेतो नि:शुल्क आरक्षित ठेवणेबाबत | साईनिवास अतिथीग्रह येथील प्रति ए.सी.रुम प्रत्येकी एका दिवसासाठी रु.८००/- प्रमाणे पाच दिवसासाठी एकूण १० रुम्स करिता<br>(१० x ५ x ८००) | रु.४०,०००/- |
| ०३ | ०२/११/२०१२ | मा.महनीय व्यक्ती यांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने<br>१) ५० पोलीस निरीक्षक व १०० स.पो.नि./पो.स.ई. यांचे निवासासाठी दि.१२/११/२०१२ ते १६/११/२०१२ पावेतो पाच दिवसांसाठी ५०० रुम भक्तनिवास येथील ५० रुम नि:शुल्क आरक्षित करणे<br><br>२) तसेच ८०० पोलीस कर्मचारी व १०० महिला पोलीस कर्मचारी यांचे निवासासाठी पाच दिवसांसाठी साई उद्यान व उपलब्धतेनुसार ५ हॉल (नविन) नि:शुल्क ठेवणेत यावेत. | १) अ) श्री साईबाबा भक्तनिवास (५०० रुम्स) येथील एका रुमसाठी रु.१६२/- प्रमाणे x ५ दिवस याप्रमाणे एकूण ५० खोल्यांसाठी सेवाआकार<br>ब) चहा - १५० x २ वेळा x रु.१ x ५दिवस<br>नाष्टा - १५०xरु.५x ५दिवस<br>जेवण - १५० x रु.४० x २ वेळा x ५ दिवस<br><br>साई उद्यान एकूण हॉल ८ प्रति हॉलचा दैनंदिन सेवाआकार रु.७००/- याप्रमाणे ८ हॉलचा पाच दिवसाचा सेवाआकार<br>चहा - ९०० x रु.१ x २ वेळा x ५दिवस<br>नाष्टा - ९०० x रु.४ x ५दिवस<br>जेवण - ९०० x रु.१० x २ वेळा x ५ दिवस | रु.४०,५००/-<br>रु.१,५००/-<br>रु.३,७५०/-<br>रु.६०,०००/-<br><br>रु.२८,०००/-<br>रु.९,०००/-<br>रु.१८,०००/-<br>रु.९०,०००/- |
| ०४ | ०२/११/२०१२ | मा.महनीय व्यक्ती यांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने बंदोबस्तसाठी नगर व बाहेरील जिल्ह्यातुन येणाऱ्या ११०० पोलीस कर्मचाऱ्यांचे निवासासाठी श्री साईनाथ मंगल कार्यालय उपलब्ध करुन द्यावे. | श्री साईनाथ मंगल कार्यालयाचा प्रति दिनी सेवाआकार रु.२०००/- याप्रमाणे दि.१५-१६/११/२०१२ दोन दिवसासाठी<br>चहा - ११०० x रु.१ x १ वेळा x १ दिवस<br>नाष्टा - ९०० x रु.४ x १ दिवस<br>जेवण - ९०० x रु.१० x २ वेळा x १ दिवस | रु.४,०००/-<br>रु.११००/-<br>रु.३६००/-<br>रु.१८,०००/- |
| ०५ | ०२/११/२०१२ | हेलीपॅड ते १००० रुम ते नविन प्रसादालय या दरम्यान रोडवरील दोन्ही बाजूकडील झाडांच्या फांद्या झाडण्याची व्यवस्था करणे. | बगीचा विभागामार्फत सदरची कार्यवाही करता येईल. | रु.३०,०००/- |
| ०६ | ०२/११/२०१२ | मा.महनीय व्यक्ती यांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने दौऱ्याचे प्रसंगी बंद पडलेल्या वाहनांची ने-आण करण्यासाठी संस्थान मार्फत | एक क्रेन संस्थानकडे उपलब्ध आहे. दुसऱ्या एका क्रेनला एका दिवसासाठी रु.२०००/- प्रमाणे एका क्रेनसाठी दोन दिवसांचे भाडे | रु.४,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | दोन क्रेनची व्यवस्था करणे. | | |
| ०७ | ०२/११/२०१२ | मा.महनीय व्यक्ती यांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने संस्थान मार्फत दि.१६/११/२०१२ रोजी त्यांचे आगमन ते प्रयानपर्यंत हेलीपॅड ते कार्यक्रम ठिकाण ते नविन प्रसादालय व दौऱ्याचा मार्ग या दरम्यान रोडचे दोन्ही कडील बाजूस बांबू बल्लीचे बॅरीगेटींग लावण्याची व्यवस्था करणे. | बांबुचे बॅरीगेटींग सार्वजनिक बांधकाम विभाग मार्फत करण्यात येणेबाबत शिर्डी पोलीस स्टेशनला कळविण्यात आले आहे. | |
| ०८ | ०२/११/२०१२ | मा.महनीय व्यक्ती यांना झेड प्लस वर्गवारीची सुरक्षा व्यवस्था असल्याने त्यांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने संस्थान मार्फत अंदाजे ३० मीटर लांबीचे १० नायलॉन दोर मिळावेत. | संरक्षण विभागाकडे उपलब्ध असलेले दोर देता येतील. | खर्च नाही |
| ०९ | ०२/११/२०१२ | मा.महनीय व्यक्ती यांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने बंदोबस्तासाठी बाहेरील जिल्ह्यातुन येणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना पोलीस स्टेशनहून बंदोबस्त वाटप झालेनंतर बंदोबस्त ठिकाणी ने-आण करण्याकरिता तसेच त्यांचे राहण्याचे ठिकाणापासून बंदोबस्त ठिकाणी जाणे-येणे करिता दि.१३/११/२०१२ ते १६/११/२०१२ संस्थानच्या दोन बसेस उपलब्ध करुन देणे. | संस्थानकडे दैनंदिन वापरात असलेल्या दोन बसेस उपलब्ध करुन देता येईल. | खर्च नाही. |
| १० | ०२/११/२०१२ | मा.महनीय व्यक्ती यांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे अतिदक्षता विभागात दोन बेड मा.महनीय व्यक्ती यांचेसाठी अद्ययावत सुविधांसह दि.१६/११/२०१२ रोजी आरक्षीत ठेवणेबाबत. | श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये सदर व्यवस्था करण्यात येत आहे. | खर्च नाही |
| ११ | ०२/११/२०१२ | मा.महनीय व्यक्ती यांचे सुरक्षित तेच्या दृष्टीने श्री साईबाबा संस्थानचे नविन प्रसादालयाचे पश्चिमेकडील मोकळया जागेत मा.महनीय व्यक्तीचे वाहन ताफा वळविण्यात येणार असल्याने सदर मोकळया जागेत मुरूम टाकून संस्थान मार्फत अद्ययावत करणेबाबत | संस्थान उपयोगासाठी यापुर्वीच सदरचे जागेवर वाहन तळाची व्यवस्था केलेली आहे. उपरोक्तकामी सदरचे वाहनतळ उपलब्ध करुन देता येईल. सबब, याकामी खर्च नाही. | खर्च नाही. |
| १२ | ०२/११/२०१२ | मा.महनीय व्यक्ती हे हेलीकॅप्टरने येणार असल्याने श्री साईबाबा संस्थानचे निमगाव शिवारातील हेलीपॅड दि.१६/११/२०१२ रोजी राखीव ठेवणे | निमगाव शिवारातील संस्थानचे हेलीपॅड दि.१६/११/२०१२ रोजी मा.राष्ट्रपती महोदय यांचेसाठी राखीव ठेवण्यात आले आहे. मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद सदरचे खर्चास यांची मान्यता आहे. | |
| १३ | ०२/११/२०१२ | मा.महनीय व्यक्ती यांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने दि.१६/११/२०१२ रोजी श्री साईबाबा मंदिर व परिसरात | श्री साईबाबा मंदिर व परिसरात दर्शन लाईन, जनसंपर्क कार्यालय, सत्यनारायण हॉल, संरक्षण कार्यालय इत्यादी ठिकाणी | खर्च नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | मोबाईल जामर बसविण्यात यावेत. | मोबाईल जामर कायमस्वरुपी बसविण्यात आलेले आहेत. | |
| १४ | ०२/११/२०१२ | मा.महनीय व्यक्ती यांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने कार्यक्रमाचे ठिकाणाजवळील ५०० रुम भक्तनिवास येथील दोन ए.सी.रुम ह्या दौऱ्याचे वेळी मा.अतिमहत्वाच्या व्यक्ती यांचेकरिता सेफ हाऊस म्हणून ठेवणे त्या रुममध्ये अत्याधुनिक सुविधांसह तात्काळ नूतनीकरण करण्यात यावे.<br>तसेच मा.महनीय व्यक्ती हे श्री साईबाबांचे दर्शनाकरिता येणार असल्याने मंदिरजवळचे अतिथी निवास (२४ रुम) येथे १ रुम व हेलीपॅड येथील १ रुम सेफ हाऊस म्हणून सर्व अत्याधुनिक तयार करुन ठेवणेस व सर्व सेफ हाऊसचे ठिकाणी जनरेटरची सुविधा उपलब्ध करुन देणे. | ५०० रुम भक्तनिवास व हेलीपॅड येथे सेफ हाऊस उपलब्ध करुन देता येईल.<br>मात्र साईनिवास अतिथीगृह (२४ रुम) या ठिकाणी लिफ्टची सुविधा नसल्याने सेफ रुम उपलब्ध करुन देता येणार नसलेबाबत शिर्डी पोलीस स्टेशन यांना कळविता येईल. | ---<br>--- |
| १५ | ०२/११/२०१२ | मा.महनीय व्यक्ती यांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने दि.१६/११/२०१२ रोजी श्री साईबाबा मंदिराचे दक्षिण बाजूकडील गेट नंबर ३ ते द्वारकामाई ते गेट नं.४ ते फुल मार्केट चौक हा रोड पर्यायी मार्ग म्हणून तयार करण्यात यावा. | सदरची बाब नगरपंचायतचे अखत्यारीतील असल्याने त्यासाठीचे कार्यवाही बाबत उलट टपाली पोलीस निरीक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन यांना कळविण्यात आले आहे. | --- |
| १६ | ०२/११/२०१२ | मा.महनीय व्यक्ती यांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने श्री साईबाबा समाधी मंदिराचे गेट नंबर ३ समोरी बॅरीगेटींग व्यवस्थित करुन घेणे. तेथील ड्रेनेज लाईन संस्थान मार्फत साफ व चेक करुन घ्याव्यात. | सदरची कार्यवाही संस्थान मार्फत करुन घेण्यात येत आहे. | --- |
| १७ | ०२/११/२०१२ | मा.महनीय व्यक्ती यांना झेड प्लस वर्गवारीची सुरक्षा व्यवस्था असल्याने त्यांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने दि.१६/११/२०१२ रोजी संस्थानची रुग्णवाहिका स्टाफसह सुसज्ज ठेवावी.<br>श्री साईबाबा हॉस्पिटल मधील आय.सी.यु. मधील दोन कॉट सर्व सोयी सुविधांसह आरक्षित करावीत.<br>संस्थान विभागातील दि.१६/११/२०१२ रोजी ०४/१२, १२/२०, २०/०४ या डयुटीचे कर्मचारी यांची नांवे पत्ता, याबाबतची यादी पोलीस स्टेशनला कळवावी.<br>दि.१५/११/२०१२ व १६/११/२०१२ रोजी मंदिरातील पुजारी व संस्थानकडील उपस्थित राहणाऱ्या मान्यवरांची नांवे पत्ता याची यादी पोलीस स्टेशनकडे | नोंद घेण्यात आली. व्यवस्था करण्यात येईल.<br>नोंद घेण्यात आली. व्यवस्था करण्यात येईल.<br>या कार्यक्रमांचे सबंधीत असणाऱ्या कर्मचाऱ्यांचे नांवाची यादी त्यांचे पत्ते, फोटो इ. दि.०२/११/२०१२ रोजी संरक्षण विभागाला देण्यात आली आहे. शिर्डी पोलीस स्टेशनला देण्यात आले आहे. उर्वरीत कर्मचाऱ्यांची यादी देण्यात येत आहे. | --- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | कळवावी. मा.महनीय व्यक्ती यांचे स्वागतासाठी संस्थानकडील उपस्थितीतांची यादी व कार्यक्रमाबाबतची माहिती पोलीस स्टेशनकडे सादर करावी. | | |
| १८ | ०२/११/२०१२ | खालील ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात सी. सी.टी.व्ही. कॅमेरे तात्काळ बसविणे.<br>१) संस्थान हेलीपॅड,<br>२) १००० रुम परिसर<br>३) कार्यक्रमाचे ठिकाणी<br>४) हेलीपॅड ते १००० रुम पर्यंतचा मार्ग<br>५) नविन प्रसादालय<br>६) साईबाबा मंदिर | मंदिर व मंदिर परिसरात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविले आहेत.<br>उर्वरित ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणेसाठी अंदाजे रुपये- पंचवीस लाख मात्रचा खर्च अपेक्षित आहे.सदरचा खर्च करणेसाठी सद्दपरिस्थितीत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. मा.न्यायालयाची खर्चासाठी परवानगी मिळाल्यानंतर सी.सी.टी.व्ही.कॅमेरे खरेदी करणेसाठी, खरेदीच्या विहीत पध्दतीनुसार वर्तमान पत्रात जाहीरात देऊन निविदा मागणी करुन, निविदाधारकांशी दराबाबत वाटाघाटी करुन खरेदीचा निर्णय घ्यावा लागेल.<br>उपरोक्त परिस्थिती विचारात घेता अत्यल्प कालावधी असल्याने सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणेची व्यवस्था करणे संस्थानला शक्य नाही, असे शिरडी पोलिस स्टेशन, शिरडी यांना लेखी पत्राने कळविण्यात येत आहे. | --- |
| १९ | ०२/११/२०१२ | मा.महनीय व्यक्ती यांचे बंदोबस्ताचे नियोजन करावयाचे असल्याने मा.महनीय व्यक्ती यांचा दौरा कार्यक्रम व श्री साईबाबा संस्थानचे वतीने काय कार्यक्रम घेण्यात येणार आहेत याबाबतची सविस्तर माहिती पोलीस स्टेशनला कळविण्यात यावी. | मा.राष्ट्रपती भवन येथून प्राप्त झाल्यानंतर मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचेकडून घेणेबाबत कळविता येईल. | --- |

मा.राष्ट्रपती महोदय यांचे शिर्डी दौऱ्यासंदर्भात खर्चास मान्यता मिळणेकामी मे.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे संस्थानने सादर केलेल्या सिव्हील ॲप्लीकेशन नं.१२६९५/२०१२ मध्ये रु.७७ लाखाचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्याखेरीज आता मा.पोलीस निरीक्षक शिर्डी पोलीस स्टेशन यांनी उपरोक्त नमूद केलेल्या बाबी संदर्भात खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती.

१) अ.नं.६, ८ ते १४, १६, १७, १९ या बाबी संस्थान मार्फत दैनंदिन भक्तांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधा असल्याने व त्या नि:शुल्क असल्याने त्या पोलीस निरीक्षक, शिर्डी यांना मा.राष्ट्रपती महोदय यांचे शिर्डी दौऱ्यादरम्यान उपलब्ध करुन देण्यास मान्यता असावी.

२) अ.नं.१ ते ५ या बाबी संस्थानमार्फत भक्तांना दैनंदिन पुरविण्यात येणाऱ्या सुविधा आहेत. परंतु त्यास संस्थानमार्फत अतिशय अल्प दरात शुल्क आकारले जाते. तरी उपरोक्त सुविधा शिर्डी पोलीस निरीक्षक शिर्डी यांना सशुल्क उपलब्ध करुन द्यावयाच्या किंवा नि:शुल्क/ सशुल्क उपलब्ध करुन द्यावयाचे ठरलेस अंदाजे रु.३,६४,६५०/- (अक्षरी रुपये तीन लाख चौसष्ठ हजार सहाशे पन्नास रुपये मात्र) इतक्या

रक्कमेबाबत पोलीस निरीक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन यांना कळविणेस मान्यता असावी. तसेच याव्यतिरिक्त येणाऱ्या प्रासंगीक खर्चास मान्यता असावी. अशा खर्चास कार्योत्तर मान्यता घेण्यात येईल.

३) ज्या सुविधा साईबाबा संस्थानचे अखत्यारीतील नाही. अशा अ.नं.७,१५,१८ याबाबत संबंधीत विभागांना कळविणेस पोलीस स्टेशन, शिर्डी यांना लेखी पत्राद्वारे कळविणेस मान्यता असावी.

४) अ.नं.२ मध्ये नमूद केलेल्या साईनिवास अतिथीगृह येथील २४ रुम्स व द्वारावती येथील २५ ए.सी.रुम्स ह्या संस्थान कार्यक्रमासाठी येणारे मान्यवर, मंत्रीमहोदय, त्यांचे सोबतचे वरीष्ठ अधिकारी व त्यासंबधी कार्यालयासाठी राखीव ठेवाव्या लागणार असल्यामुळे त्या राखीव ठेवणेस व संबंधीत पाहुण्यांची निःशुल्क निवासव्यवस्था करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र. ८७४ यावर सविस्तर चर्चा होऊन,**

**(१) प्रस्तावातील अ.नं.६, ८ ते १४, १६, १७, १९ या बाबी संस्थान मार्फत दैनंदिन भक्तांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधा असल्याने व त्या निःशुल्क असल्याने त्या पोलीस निरीक्षक, शिर्डी यांना मा.राष्ट्रपती महोदय यांचे शिर्डी दौऱ्यादरम्यान उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(२) प्रस्तावात अ.नं. १ ते ४ मध्ये नमुद केलेप्रमाणे मा.महनीय व्यक्ती यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बंदोबस्तासाठी येणारे पोलिस अधिकारी व कर्मचारी यांचे शिर्डी वास्तव्याच्या काळात संस्थान निवासस्थानामध्ये निवासाची व्यवस्था व चहा, नाष्टा, भोजन इ.ची व्यवस्था संस्थानचे कॅन्टीन व प्रसादालय येथे संस्थानमार्फत निशुल्क करणेत यावी.**

**तसेच अ.नं.५ मध्ये नमूद केलेप्रमाणे हेलीपॅड, साईआश्रम १ ते नवीन प्रसादालय या दरम्यान नगर-मनमाड रस्त्यावरील दोन्ही बाजूकडील झाडांच्या फांद्या छाटण्याची व्यवस्था संस्थानमार्फत करणेत यावी. प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे यासाठी येणाऱ्या अंदाजे रु.३,६४,६५०/- मात्रचे खर्चास व या व्यतिरिक्त येणाऱ्या प्रासंगिक खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(३) प्रस्तावात नमुद केलेल्या अ.नं.७,१५,१८ या सुविधा संस्थानच्या अखत्यारीत नसल्याने त्याबाबत शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी यांना लेखी पत्राद्वारे कळविणेत यावे, असे ठरले.**

**(४) प्रस्तावातील अ.नं.२ मध्ये नमूद केलेल्या साईनिवास अतिथीगृह येथील २४ रुम्स व द्वारावती येथील २५ ए.सी.रुम्स ह्या संस्थान कार्यक्रमासाठी येणारे मान्यवर, मंत्रीमहोदय, त्यांचे सोबतचे वरीष्ठ अधिकारी व त्यासंबधी कार्यालयासाठी राखीव ठेवाव्या लागणार असल्यामुळे त्या राखीव ठेवणेस व संबंधीत पाहुण्यांची निःशुल्क निवासव्यवस्था करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्रशासन शाखा, वशी-०५/ साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.१८** **श्री.अशोक मुरलीधर काळे, लेखाधिकारी, लेखाशाखा विभाग यांचा संस्थान सेवेत मुदतवाढ मिळणेबाबतच्या अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री अशोक मुरलीधर काळे, लेखाधिकारी, लेखाशाखा यांनी दि.११/१०/२०१२ चे अर्जाने खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे.

"मी संस्थान सेवेत वरिष्ठ लेखापाल म्हणून दि.०१/१२/१९८५ पासून रुजू झालेलो आहे. दि.०७/१०/१९९५ रोजी मला बढती मिळून लेखाधिकारी या पदावर माझी नियुक्ती झालेली आहे आज अखेर माझी एकूण २७ वर्ष सेवा झालेली आहे. लेखाधिकारी या पदाची तेवढयाच जबाबदारीने व प्रामाणिकपणे काम केलेले आहे, आज अखेर केलेली सेवा निष्कलंक आहे. संस्थान नियमानुसार मी दि.३१/१०/२०१२ रोजी सेवानिवृत्त होत असून यापूढे माझी सेवा करण्याची इच्छा आहे. सदर सेवा करण्यासाठी मी आजही शारिरीक व मानसिक दृष्टीने सक्षम आहे आजपर्यंत केलेली सेवा मी यापूढे जबाबदारीने व प्रामाणिकपणे सेवा करण्याची हमी देत आहे. तरी मला संस्थानमध्ये पुन्हा सेवा करण्याची संधी मिळावी. "

सदर अर्जावर मुख्यलेखाधिकारी यांनी "श्री अशोक काळे, लेखाधिकारी यांची आजपर्यंतची सेवा अनुभव प्रामाणिक व जबाबदारीची आहे त्यांच्या सेवानिवृत्तीमुळे लेखाशाखेत मोठी पोकळी निर्माण होणार आहे. वाढत्या कामकाजाचा व्याप पाहता संस्थानला अजूनही श्री काळे यांच्या सेवेची अत्यावश्यकता आहे. सबब त्यांना संस्थान सेवेत मुदतवाढीची संधी मिळावी ही नम्र विनंती."

श्री काळे हे दि.३१/१०/२०१२ अखेर त्यांचे विहित वयोमान पूर्ण होत असल्याने त्यांना जा.नं.एसएसएस वशी ०१/१९९३/२०१२ दि.११/१०/२०१२ अन्वये सेवानिवृत्तीचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०८/२०११ चे निर्णय क्र.६६१ मध्ये "येथून पुढे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी सेवानिवृत्तीनंतर सेवेत मुदतवाढ मागितल्यास नाकारणेत येऊन सदर प्रस्ताव व्यवस्थापन समितीपुढे सादर करणेत येऊ नये असा झालेला आहे."

श्री काळे, लेखाधिकारी, लेखाशाखा यांचा मुदतवाढीबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ८७५ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कामाची निकड लक्षात घेता व मुख्यलेखाधिकारी- लेखाशाखा विभाग यांचे अभिप्रायानुसार श्री.अशोक मुरलीधर काळे, सेवानिवृत्त लेखाधिकारी यांना कंत्राटी**

**पध्दतीने रु.२१,०००/- मात्र एकत्रित मासिक मानधनावर सहा महिन्यांसाठी कंत्राटी पध्दतीने कामास घेणेत यावे. मुख्यलेखाधिकारी, लेखाशाखा विभाग यांनी श्री.काळे यांना लेखाशाखा विभागाकडे योग्य ती कामे नेमून द्यावीत असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना)

---

**विषय नं.१९** **श्रीरामपुर येथील भूसंपादन कक्ष व सदर कक्षाकडे कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचाऱ्यांच्या मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५-१६ व १७ जुलै २००० रोजीच्या सभेतील निर्णय क्र. २३८ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीकरीता भूसंपादनाची कामे करणेकामी मा. उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर (महसूल) यांचे पर्यवेक्षणाखाली श्रीरामपूर येथे कक्ष स्थापन करणेत आलेला आहे. त्यानुसार सदर कक्षाकडे कामे करणेकामी खालीलप्रमाणे कर्मचारी वृंद मंजूर करण्यात आलेला असून त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे वेतन/मानधन ठरविण्यात आले आहे.

| **अ.नं.** | **तपशील** | **मागणी संख्या** | **सुरुवातीस देण्यात येत असलेले मानधन** |
|---|---|---|---|
| ०१ | तहसिलदार संवर्गातील | ०१ | ७०००/- |
| ०२ | अव्वल कारकुन संवर्गातील कर्मचारी | ०२ | ५०००/- |
| ०३ | लिपीक संवर्गातील कर्मचारी (कुशल) | ०२ | ४०००/- |
| ०४ | शिपाई | ०१ | २५००/- |
| ०५ | वाहन-चालक | ०१ | ४०००/- |

त्यानुसार सध्या सदर कक्षाकडे खालीलप्रमाणे कर्मचारी वृंद कामे पहात असून त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे वेतन/मानधन देण्यात येत आहे.

| **अ.नं.** | **कर्मचा-यांचे नांव** | **संख्या** | **सध्या प्रतिमाह देण्यात येत असलेले मानधन** |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. बी.आर. वाव्हळ, सेवानिवृत्त नायब तहसीलदार | ०१ | १०,०००/- |
| ०२ | श्री.रामचंद्र भा. नागरे अव्वल कारकून | ०१ | ७०००/- |
| ०३ | **कंत्राटदारामार्फत** लिपीक-टंकलेखक (संवर्ग ) | ०४ | कुशल किमान वेतनाप्रमाणे |
| ०४ | **कंत्राटदारामार्फत** शिपाई | ० १ | अकुशल किमान वेतनाप्रमाणे |

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१२ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार सदर कक्ष व कक्षाकडील कंत्राटी पध्दतीने नेमणूका करण्यात आलेले कर्मचारी यांना देण्यात आलेली सहा महिन्यांची मुदतवाढ दि.३१/१०/२०१२ अखेर संपुष्ठात येत आहे.

मा.उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांनी दि.२७/०९/२०१२ चे प्रस्तावान्वये भूसंपादनाची एकूण १६ प्रकरणे चालू असल्याने सदर प्रकरणांचा जलद गतीने निपटारा करणेकामी भूसंपादन कक्षाची व सदर कक्षाकडें कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचा-यांची आवश्यकता असल्याने त्यांना पुढील एक वर्षासाठी मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

सदर अर्जावर वरिष्ठ मुख्य अभियंता, बांधकाम विभाग यांनी " श्रीरामपूर यांचे कार्यालयातील भूसंपादन कक्षास व कक्षाकडील ०७ कर्मचाऱ्यांना मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी सुचित केले प्रमाणे ०१ वर्षासाठी मुदतवाढ देणेस हरकत नाही. " असे अभिप्राय दिलेले आहेत.

मा.उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांचे पत्रातील विनंती व वरिष्ठ मुख्य अभियंता, बांधकाम विभाग यांचे अभिप्राय विचारात घेऊन सदर कक्षास मुदतवाढ देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ८७६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीरामपूर भू-संपादन कक्षास व या कक्षाकडे कंत्राटी पद्धतीने नेमलेल्या कंत्राटी अधिकारी/ कर्मचाऱ्यांना दि.०१.११.२०१२ ते दि.३०.०४.२०१३ अखेर सहा महिने कालावधीसाठी पुर्वीच्याच अटी/शर्तीनुसार मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना )

---

**विषय नं.२०** **श्री.व्ही.व्ही. कन्नन ऑफिस इन्चार्ज, माहिती केंद्र, चेन्नई यांचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री व्ही.कन्नन, ऑफिस इनचार्ज, माहिती केंद्र, चेन्नई यांनी दि.०९/१०/२०१२ रोजीच्या अर्जाने मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

सदर अर्जावर अधीक्षक, प्रकाशने विभाग यांनी " व्ही.कन्नन, कार्यालय प्रमुख, माहिती केंद्र, चेन्नई हे प्रामाणिक असून त्यांची वर्तणूक चांगली आहे. त्यांना एक वर्षासाठी त्या पदावर मुदतवाढ देणेस हरकत नाही." नाही असे अभिप्राय दिलेले आहेत.

श्री व्ही.कन्नन यांच्या नेमणूकीचा कालावधी दि.०२/११/२०१२ अखेर संपूष्ठात येत असून त्यांनी दि.०९/१०/२०१२ रोजीच्या अर्जाने मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार श्री व्ही. कन्नन यांची " ऑफिस इनचार्ज " म्हणून जा.नं.एसएसएस वशी ०१/३९७६/२०११ दि.०३/११/२०११ अन्वये शिर्डी साई ट्रस्ट चेन्नई (तामिळनाडू) येथील संस्थानचे माहिती केंद्रासाठी प्रतिमहा रु.८०००/- एकत्रित वेतनावर एक वर्ष कालावधीसाठी नेमणूक करण्यात आली होती. त्यानुसार ते दि.०३/११/२०११ रोजी कामावर हजर झालेले आहेत.

श्री व्ही.कन्नन यांच्या अर्जातील विनंती व अधीक्षक, प्रकाशने विभाग यांचे अभिप्राय विचारात घेता श्री व्ही.कन्नन यांना दि.०३/११/२०१२ पासून पूढे एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने मुदतवाढ देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ८७७ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.व्ही.व्ही. कन्नन, ऑफिस इन्चार्ज, माहिती केंद्र, चेन्नई यांना प्रतिमहा रु.८०००/- एकत्रित वेतनावर दि.०३/११/२०१२ पासून पूढे एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना)

---

**विषय नं.२१ श्री.एस. कृष्णमुर्ती, ऑफिस इन्चार्ज, माहिती केंद्र, बेंगलोर यांचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री एस.कृष्णमूर्ती, ऑफिस इनचार्ज, माहिती केंद्र, बेंगलोर यांनी दि.०६/०९/२०१२ रोजीच्या अर्जाने मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

सदर अर्जावर अधीक्षक, प्रकाशने विभाग यांनी " श्री एस.कृष्णमूर्ती, कार्यालय प्रमुख, माहिती केंद्र, बेंगलोर हे प्रामाणिक असून त्यांची वर्तणूक चांगली आहे. त्यांना एक वर्षासाठी त्या पदावर मुदतवाढ देणेस हरकत नाही." नाही असे अभिप्राय दिलेले आहेत.

श्री एस.कृष्णमूर्ती यांच्या नेमणूकीचा कालावधी दि.०२/११/२०१२ अखेर संपूष्ठात येत असून त्यांनी दि.०६/०९/२०१२ रोजीच्या अर्जाने मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार श्री एस.कृष्णमूर्ती यांची " ऑफिस इनचार्ज " म्हणून जा.नं.एसएसएस वशी ०१/३९७७/२०११ दि.०३/११/२०११ अन्वये बेंगलोर येथील संस्थानचे माहिती केंद्रासाठी प्रतिमहा रु.८०००/- एकत्रित वेतनावर एक वर्ष कालावधीसाठी नेमणूक करण्यात आली होती. त्यानुसार ते दि.०३/११/२०११ रोजी कामावर हजर झालेले आहेत.

श्री एस.कृष्णमूर्ती यांच्या अर्जातील विनंती व अधीक्षक, प्रकाशने विभाग यांचे अभिप्राय विचारात घेता श्री एस.कृष्णमूर्ती यांना दि.०३/११/२०१२ पासून पूढे एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने मुदतवाढ देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ८७८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.एस. कृष्णमुर्ती, ऑफिस इन्चार्ज, माहिती केंद्र, चेन्नई यांना प्रतिमहा रु.८०००/- एकत्रित वेतनावर दि.०३/११/२०१२ पासून पूढे एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१. साई आश्रम प्रकल्पाचे उद्घाटन समारंभासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी केलेल्या कार्यवाहीबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम या भक्तनिवास प्रकल्पाचा उद्घाटन समारंभ दि.१६/११/२०१२ रोजी मा. राष्ट्रपती, भारत सरकार यांचे शुभहस्ते करण्याचे योजीले आहे. सदरचे कार्यक्रमासाठी येणारे अंदाजे अपेक्षित रु.१२.०० लक्ष मात्रचे खर्चास दि.०८/१०/२०१२ रोजीचे मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेत मान्यता देणेत आलेली आहे. त्यामध्ये मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्थेसाठी रु.७.०० लक्ष मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देणेत आली आहे.

सदरहू कार्यक्रमासाठी लोखंडी कॉलम, कैची/ ट्रस असलेला डोम टाईप मंडप गृहीत धरण्यात आलेला आहे. तसेच त्यामध्ये स्टेज त्यावर वेलवेट मॅटीन व संपूर्ण मंडपामध्ये सिंथेटीक मॅटीन घेण्यात आलेली आहे. सदरचे मंडपामध्ये व्हि.आय.पी. सोफे, पी.व्ही.सी. खुर्च्या इ. अनुषंगीक व्यवस्थेसाठी इकडील विभगामार्फत कोटेशन तयार करुन दिनांक २५/१०/२०१२ रोजीचे कोटेशन मागणीपत्रान्वये पुणे, औरगांबाद, नाशिक, नागपूर व नगर येथील मंडप ठेकेदार यांना इकडील जा. नं. ३३२१/२०१२ दि. २५ ऑक्टोबर, २०१२ रोजीचे कोटेशन पत्र देवून दि. ३१/१०/२०१२ पर्यंत सिलबंद कोटेशन सादर करण्याची मुदत देण्यात आली. त्यानुसार खालील ठेकेदार यांनी कोरे कोटेशन विकत घेतले होते.

| अ. क्र | मंडप ठेकेदाराचे नाव | अ. क्र | मंडप ठेकेदाराचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर | ०६ | शर्मा मंडप डेकोरेटर्स, वैजापूर |
| ०२ | लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर | ०७ | कादरी ॲण्ड सन्स ,नाशिक |
| ०३ | जाधव मंडप डेकोरेटर्स, औरगाबाद | ०८ | कला साधना डेकोरेटर्स, नाशिक |

| | | | |
|---|---|---|---|
| ०४ | स्वास्तीक मंडप वर्क्स, अहमदनगर | ०९ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदगनर |
| ०५ | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | १० | शगुन इव्हेन्टस ॲण्ड मार्केटींग सर्व्हिसेस्, नागपूर |

वरील पैकी विहीत मुदतीत खालील ठेकेदारांनी सिलबंद कोटेशन सादर केलेले आहेत.

| अ.क्र | कोटेशन सादरकर्त्यांचे नाव | आवक नंबर / दिनांक |
|---|---|---|
| ०१ | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर | ११५५४ / ३१.१०.२०१२ |
| ०२ | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | ११५२६ / ३०.१०.२०१२ |
| ०३ | शर्मा मंडप डेकोरेटर्स, वैजापूर | ११५५३ / ३१.१०.२०१२ |
| ०४ | कादरी ॲण्ड सन्स, नाशिक | ११५२७ / ३०.१०.२०१२ |
| ०५ | कला साधना डेकोरेटर्स, नाशिक | ११५५५ / ३१.१०.२०१२ |
| ०६ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर | ११५५२ / ३१.१०.२०१२ |
| ०७ | शगुन इव्हेन्टस ॲण्ड मार्केटींग सर्व्हिसेस्, नागपूर | ११५५१ / ३१.१०.२०१२ |

सदरहू काम तातडीचे असल्याने विहीत मूदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त सिलबंद निविदा मा. कार्यकारी अधिकारी सोा यांचे समक्ष दि.०१/११/२०१२ रोजी उघडून मंडप ठेकेदार यांचेशी दराबाबत चर्चा वाटाघाटी करण्यात आल्या असता त्यांनी दिलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

साई आश्रम प्रकल्पाचे उद्‌घाटन समारंभासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी दरपत्रकांचा तुलनात्मक तपशिल.

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | परिमाण / एकक | कोटेशन सादरकर्त्यांचे नांव / दर | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर | | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | | शर्मा मंडप डेकोरेटर्स, वैजापूर | | कादरी ॲण्ड सन्स, नाशिक | | कला साधना डेकोरेटर्स, नाशिक | | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर | | शगुन इव्हेन्टस ॲण्ड मार्केटींग सर्व्हिसेस, नागपूर | |
| | | | कोटेशन मधील दर | चर्चा नंतरचे दर | कोटेशन मधील दर | चर्चा नंतरचे दर | कोटेशन मधील दर | चर्चा नंतरचे दर | कोटेशन मधील दर | चर्चा नंतरचे दर | कोटेशन मधील दर | चर्चा नंतरचे दर | कोटेशन मधील दर | चर्चा नंतरचे दर | कोटेशन मधील दर | चर्चा नंतरचे दर |
| १. | मंडप व्यवस्था :- ८०'x२००' | १६००० चौ. फुट | ५० | ५० | ३५ | ३० | २२ | २२ | ३० | ३० | ३५ | २८ | ४० | ३० | १४ | १४ |
| २. | मंडप व्यवस्था :- २ नग - २५'x२००' | १०००० चौ.फुट | ३५ | ३५ | २२ | १२ | २० | २० | २० | २० | २८ | १८ | ३० | २० | ०८ | ०८ |
| ३. | हेलीपॅड मंडप व्यवस्था:- ६०'x२०' | १२०० चौ.फुट | ३५ | ३५ | २२ | १२ | २० | २० | २० | २० | २८ | १८ | ३० | २० | ०८ | ०८ |
| ४. | A ब्लॉक इमारती समोर मंडप व्यवस्था करणे:- ७०'x३०' | २१०० चौ.फुट | ३५ | ३५ | २२ | १२ | २० | २० | २० | २० | २८ | १८ | ३० | २० | ०८ | ०८ |
| ५. | स्टेज व्यवस्था :- ३०'x४०' | १२०० चौ. फुट | १८० | १८० | १३५ | १३५ | ४० | ४० | १२० | १२० | १५५ | १२० | १६५ | १४० | ५० | ५० |
| ६. | स्वागत कमानी: १'-६" x१'-६" | ०४ नग | ३०००० | ३०००० | ६५०० | ४००० | ५००० | ५००० | ११००० | ११००० | २३००० | १२००० | २६००० | २२००० | ६००० | ६००० |
| ७ | संपुर्ण मंडपात सिंथेटीक कारपेट टाकणे | २४८०० चौ. फुट | १६.५० | १६.५० | ११.५० | १० | ०३ | ०३ | १२ | १२ | १३.५० | ७.५० | १५ | १३ | ०२ | ०२ |
| ८ | मंडपाचे बाजूने पूर्ण ६ फुट उंचीची सफेद कनात | ६०० रनिंग फुट | १६० | १६० | २९ | २० | १० | १० | ३० | ३० | १४० | १०० | १४० | १२० | १५ | १५ |
| ९ | पी.व्ही.सी. खुर्च्या | १५०० नग | ४० | ४० | १५ | १५ | १५ | १५ | १५ | १५ | २५ | २५ | ३० | ३० | ०८ | ०८ |
| १० | व्हि.आय.पी. सोफासेट ०३ सिटर | ४० नग | १२०० | १२० | ७०० | ७०० | ३०० | ३०० | ११०० | ११०० | ९०० | ७०० | १०५० | ९५० | ४०० | ४०० |
| ११ | **बॅरेगेटींग व्यवस्था करणे** | २५०० र. फुट | ५५ | ५५ | ३० | ३० | ३० | ३० | ३० | ३० | ४७ | ४२ | ५० | ४० | १५ | ३०१५ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या कोटेशन्समध्ये शगुन इव्हेन्टसू , नागपूर यांचे दर निम्नतम स्वरुपाचे आहेत. त्यानुसार येणाऱ्या एकूण खर्चाचा तपशिल खालिलप्रमाणे आहे.

(अ) वॉटरप्रुफ छत असलेले व आतील बाजुने सुशोभित कापड असलेले मंडप उभारणे व इतर व्यवस्था करणे. सोबतचे परिशिष्टाप्रमाणे

**(कालावधी :-दि. १६/११/२०१२ अखेर ०१ दिवस )**

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | साईज | अंदाजे परिमाण / एकक | दर (रु) प्रति दिवस प्रति चौ. फुट | एकूण रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | मंडप व्यवस्था :- वॉटरप्रुफ छत असलेली मंडप व्यवस्था व आतील बाजुने सुशोभित कापडी मंडपाची उभारणी करणे. (लोखंडी कॉलम व कैच्याचे नटबोल्ट फिटींग असलेला डोम टाईप मंडप) | ८०'x२००' | १६०००.०० चौ. फुट | १४/- | २,२४,०००/- |
| ०२ | मंडप व्यवस्था :- वॉटरप्रुफ छत असलेला व आतील बाजुने सुशोभित कापडी मंडपाची उभारणी करणे . डोम टाईप मंडपाचे दोन्ही बाजुने २५' रुंद व २००' लांब एम.एस. लोखंडी कॉलम, कैची (नटबोल्ट फिटींग) व बाहेरच्या बाजुस स्लोप असलेला मंडप) | २ नग - २५'x२००' | १००००.०० चौ.फुट | ८/- | ८०,०००/- |
| ०३ | हेलीपॅड मंडप व्यवस्था :- वॉटरप्रुफ छत असलेली मंडप व्यवस्थाव आतील बाजुने सुशोभित कापडी मंडपाची उभारणी करणे (३" एम.एस. पाईप व छतास २" एम एस पाईपची फ्रेम बनविणे व मंडपाचे आतील बाजुस सुशोभित स्वच्छ कापड लावणे व मजबुत बांधी करणे) | ६०'x२०' | १२००.०० चौ.फुट | ८/- | ९,६००/- |
| ०४ | A ब्लॉक इमारती समोर मंडप व्यवस्था करणे :- वॉटरप्रुफ छत असलेली मंडप व्यवस्थाव आतील बाजुने सुशोभित कापडी मंडपाची उभारणी करणे (३" एम.एस. पाईप व छतास २" एम एस पाईपची फ्रेम बनविणे व मंडपाचे आतील बाजुस सुशोभित स्वच्छ कापड लावणे व मजबुत बांधी करणे) | ७०'x३०' | २१००.०० चौ.फुट | ८/- | १६,८००/- |
| ०५ | स्टेज व्यवस्था :- ३०'x४०' साईजचे स्टेज, सदरचें स्टेजची जमिनीपासून ३ फुटापर्यंत उंची असलेले भक्कम स्टेज तयार करणे. स्टेजवर लाल रंगाचे वेलवेट मॅटींन टाकणे. | ३०'x४०' | १२००.०० चौ. फुट | ५०/- | ६०,०००/- |
| ०६ | स्वागत कमानी:- १'-६" x१'-६" साईजचे कमीत कमी २० फुट रुंदीच्या बॉक्स टाईप कमानी बांधणे. | ०४ नग | ०४नग | ६०००/- | २४,०००/- |
| ०७ | संपुर्ण मंडपात सिंथेटीक कारपेट टाकणे | २४८००.०० चौ. फुट | २४८००.०० चौ. फुट | २/- | ४९,६००/- |
| ०८ | मंडपाचे बाजूने पूर्ण ६ फुट उंचीची सफेद कनात आवश्यक सर्पोट देवून लावणे. | ६०० रनिंग फुट | ६०० रनिंग फुट | १५/- | ९,०००/- |
| ०९ | पी.व्ही.सी. खुर्च्या | -- | १५०० नग | ८/- | १२,०००/- |
| १० | निमंत्रीत मान्यवरांना बसणेकामी व्हि.आय.पी. सोफासेट पुरविणे. (एका सोफासेटवर कमीत कमी तीन व्यक्ती बसतिल असे) | -- | ४० नग | ४००/- | १६,०००/- |
| ११ | बॅरेगेटींग व्यवस्था करणे :- कार्यस्थळावर इतर आवश्यक ठिकाणी बल्ली व बांबु वापरुन ४'-६" उंचीचे मजबुत बॅरेगेटींग करणे (कॉंक्रीटीवर ड्रीलींग करुन खड्डे घेणे ) | -- | १००० र. फुट | ३०/- | ३०,०००/- |
| १२ | बॅरेगेटींग व्यवस्था कार्यस्थळावर इतर आवश्यक ठिकाणी | | १५०० र.फुट | १५/- | २२,५००/- |
| | | | | **एकूण रक्कम रुपये-** | **५,५३,५००/-** |

साई आश्रम प्रकल्पाचे उद्‌घाटन समारंभासाठी मंडप व इतर अनुषंगीक सुविधेकरीता शगुन इव्हेन्टस्, नागपूर यांनी दिलेल्या निम्नतम दरामध्ये सदर काम करुन घेण्यात येणार आहे. त्यासाठी त्यांना जा.नं.३४३० दि.०१/११/२०१२ अन्वये कार्यादेश देणेत आला असून त्यानुसार याकामी रु.५,५३,५००/- मात्र इतका अंदाजे खर्च येणार आहे. तरी साई आश्रम प्रकल्पाचे उद्‌घाटन समारंभासाठी मंडप व इतर अनुषंगीक सुविधेकरीता वरीलप्रमाणे करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८७९ यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम प्रकल्पाचे उद्‌घाटन समारंभासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेस तसेच या कामी येणाऱ्या अंदाजे रु.५,५३,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२. दिपावली सुट्टी-२०१२ चे कालावधीत होणा-या गर्दीकरीता निवासव्यवस्थेकामी करावी लागणारी मंडपव्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** शाळा/कॉलेज यांना दि.१२/११/२०१२ (सोमवार) ते दि २६/११/२०१२ (रविवार) अखेर १५ दिवस दिपावलीच्या शैक्षणिक सुटया आहेत व त्यास जोडुन सुटीचे अगोदर दि.११/११/२०१२ रोजी रविवार सुट्टी आहे म्हणजे सलग सुट्टीचा कालावधी दि.११/११/२०१२ ते २६/११/२०१२ अखेर १६ दिवस राहिल. या कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे. येणा-या साईभक्तांची निवासव्यवस्था,प्रसाद भोजन व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्याकरीता साईबाबा भक्तनिवासस्थानचे परिसरातील खालील ठिकाणी दि.१०/११/२०१२ रोजी दुपारपासुन ते दि.२७/११/२०१२ रोजी दुपारपर्यत या कालावधीकरीता मंडप उभारणी बांधकाम विभागामार्फत करावी लागेल. त्यामुळे सुमारे १००० साईभक्तांची निवासव्यवस्था मंडपामध्ये करता येईल.

| अ.नं. | ठिकाण | मोजमाप |
|---|---|---|
| ०१. | साभनि इमारत दक्षिण बाजु पार्किंगचे जागी (निवासव्यवस्थेकामी) | ४५'x३१५'=१४१७५ चौ.फुट |
| ०२. | साभनि इमारत पश्चिम बाजु पार्किंगचे जागी (प्रसादभोजन व्यवस्थेकामी ) | ३०'x ९०' = २७०० चौ.फुट |
| ०३. | आवश्यक त्याठिकाणी पुरुषांकरीता बाथरुम, स्त्रियांकरीता सडांस/ बाथरुम असलेले ठिकाणी पडदे लावणे. | ----- |

उपरोक्तप्रमाणे तसेच साईनगर मैदान मंदीर व जुने प्रसादालय परिसरात दि.१०/११/२०१२ रोजी दुपारपासुन ते दि.२७/११/२०१२ रोजी दुपारपर्यंत या कालावधीकरीता तसेच साईनगर मैदान मंदिर परीसर व जुने प्रसादालय परिसरात मंडप उभारणीकामी अंदाजे रु.१,८५,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चाची तरतुद बांधकाम विभागाकडील मंडप व्यवस्थेकामी मंजुर रकमेतुन करता येईल त्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दिपावली सुट्टी-२०१२ चे कालावधीत होणाऱ्या गर्दीकरीता निवासव्यवस्थेसाठी साईनगर मैदान, मंदिर परीसर व जुने प्रसादालय परिसरात मंडप व्यवस्था करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये १,८५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- भक्तनिवास विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३.** **विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.८८१** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

**(१)** श्री साईबाबा संस्थानसाठी खरेदी करण्यात येणारे गावरान तुप साठविण्यासाठी आवश्यक त्या योग्य क्षमतेच्या टँकची उभारणी करण्यासाठी कन्सलटंट नेमणूक करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रस्ताव तयार करुन व्यवस्थापन समिती समोर सादर करावा. (कार्यवाही- अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

**(२)** दर्शन लाईन कॉम्प्लेक्ससाठी आर्किटेक्ट माथुर ॲण्ड कापरे- दिल्ली, शक्ती परमार ॲण्ड असोशिएटस- मुंबई, हाफीज कॉन्ट्रॅक्टर- मुंबई व सराह कन्सल्टंट- नाशिक या चौघांचे प्रेझेन्टेशन घेण्यात यावे. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र. ८५८ ते ८८१ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर रात्रौ ०९.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (किशोर मोरे) | (डॉ.संजीवकुमार) | (जयंत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी